# THE BOOK WAS DRENCHED

भारत-समाज विरचित

# हिंदु सामुदायिक पूजा

( सार्थ व सटीप )

[ द्वितीय संस्करण ]

ओं

THERE IS NO RELIGION HIGHER THAN TRUTH

संपादक

प्रो. राजाराम सखाराम भागवत, एम्. ए. ( ठाणें ).

प्रकाशक

गंगाधर रघुनाथ मडभडे, बी. ए., एलएल्. बी.

चिटणीस, मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन

१८ गणेशवाडी, डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुद्रक

केशव गणेश शारंगपाणी

आर्यभूषण मुद्रणालय ९१५/१ शिवाजीनगर पुणें

मे १९५४ ]

[ किंमत ०-४-०

UNIVERSAL LIBRARY
OU_196099
UNIVERSAL LIBRARY

# हिंदुधर्मीयांकरितां सामुदायिक पूजा.

### ( भारत समाजानें रचलेली )

## प्रस्तावना

### विधि-संस्कारांचें कार्य

सर्व धर्मांत संस्कार सांगण्यांत आलेले आहेत व ते केव्हां करावयाचे हेंहि ठरलेलें आहे. पण या कर्मकांडांतील विधि संस्कारांचें नक्की कार्य कोणतें, कोणत्या प्रकारें त्या संस्कारांपासून तें होतें याची संगतवार व संपूर्ण माहिती कोणत्याहि धर्मांत मिळत नाहीं. संस्कारांत धूप, दीप, पाणी, फुलें, प्रसाद, अग्नि वगैरे अनेक पदार्थ असतात. ते करतांना मंत्र म्हणणें, हस्तविक्षेप करणें, उठणें, बसणें, तीर्थ पीणें वगैरे नाना प्रकारच्या क्रिया कराव्या लागतात. संस्कारांत अनेक निर्बंधहि असतात. कांहीं संस्कार करतांना एखाद्या विशिष्ट दिशेकडे तोंड करावें लागतें; कांहीं संस्कार दुपारीं बाराच्या नंतर करण्याची मनाई आहे; कित्येक तर ठराविक दिवशींच करावयाचे असतात. पण संस्कारांसंबंधाच्या या ज्या गोष्टी आहेत त्यांचा अर्थ, त्यांचा उपयोग व त्यांची कारणें बहुधा लोकांस माहीत नसतात आणि त्यामुळें कित्येकांची संस्कारांवरील श्रद्धा उडून ते लोक संस्कार मुळींच करीत नाहींत. तर दुसरे अनेक लोक ते चुकीच्या पद्धतीनें वा हलगर्जीपणानें तसेंच न समजतां व केवळ गतानुगतिकत्वानें करीत राहतात.

खरोखरी कर्मकांडांतल्या ह्या विधि संस्कारापासून कोणतें कार्य होतें व तें कसें होतें हें समजणें अशक्य नाहीं. माणसाला सृष्टींतलें सर्व पदार्थ दिसत नाहींत. आपल्या पृथ्वीवरील घन पदार्थ व द्रव पदार्थ त्याला दिसतात वायुरूप पदार्थ त्याला दिसत नाहींत. आपल्या सभोंवतीं पसरलेला ईथर

तसेंच ईथरहूनहि सूक्ष्म असणारीं द्रव्यें त्याला दिसत नाहींत. वास्तविक पहातां आपणसभोंवतीं भुवर्द्रव्याचा भुवर्लोक वसलेला आहे व त्या लोकांत निरनिराळे जीव, निरनिराळे पदार्थ व निरनिराळी 'सीनसीनरी' आहे. पण ती सर्व अत्यंत विरळ अशा द्रव्याची असल्यामुळें माणसास ती दिसत नाहीं. या द्रव्यांहूनहि अधिक पातळ अशा द्रव्याचे स्वर्ग लोकादि दुसरे सूक्ष्मतर लोक आपणांभोंवतीं असतात. पण त्याहि लोकांतील क्रिया वरील कारणास्तवच आपणास दिसत नाहींत. पण जर माणसानें योगमार्गानें खटपट करून आपलीं इंद्रियें अधिक संस्कारक्षम केलीं असतील व आपल्या अंतरंगामधील नाना सामर्थ्यें विकसित केलीं असतील, तर त्या माणसास त्याच्या अधिकारानुसार या अदृश्य गोष्टी प्रत्यक्ष दिसतात. संस्कार करतांना काय काय परिणाम होतात याचें अशा अधिकारी माणसानें काळजीनें निरीक्षण केल्यास संस्कार कसे कार्यक्षम होतात, त्यांचे परिणाम कोणते, हें अनुभवानें त्यास समजतें. त्यांतील निर्बंधांचें मर्म, त्यांतील खरोखरी महत्त्वाच्या गोष्टी, त्या कशा करणें अवश्य आहे वगैरे गोष्टीहि त्याच्या नीट ध्यानांत येत असतात.

## एक अत्यंत महत्त्वाचा प्रयत्न

हिंदुधर्मांतील पूजाविधीसंबंधानें असाच एक अत्यंत महत्त्वाचा प्रयत्न अलीकडे करण्यांत आलेला आहे. विशेषतः मद्रासेकडे प्रचलित असलेली भारत—समाज नामक एक संस्था आहे. त्या संस्थेच्या विद्यमानें हा प्रयत्न झाला आहे. श्री. कृष्णमूर्ति यांनीं या कामांत पुढाकार घेतलेला आहे.[1] या पूजेचे अदृश्य भूमिकांवर काय परिणाम

---

टीपः—१. सन १९२५ सालच्या डिसेंबरांत अड्यार येथें थिऑसफिकल सोसायटीची वार्षिक (जुबिली) कनव्हेन्शन भरली होती. त्यावेळी श्री. जे. कृष्णमूर्ति यांनी अध्वर्यु म्हणून ही पूजा सार्वजनिक रीतीनें करून दाखविली होती व तेव्हांपासून ती करण्याची सुरवात झालेली आहे.

होतात याचें अवलोकन करण्याच्या कामीं डॉ. ॲनी बेझंट व विशेषतः मि. लेडबीटर यांचें श्री. कृष्णमूर्ति यांस सहाय्य झालेलें आहे. हीं तिन्हीं माणसें 'अर्हत्' पदवीपर्यंत अध्यात्ममार्गानें जाऊन पोहोंचलीं असून त्या सर्वांचा अधिकार मोठा आहे. मि. लेडबीटर हे अदृश्य भूमिकांवरील प्रकार अत्यंत बारकाईनें पाहण्यांत कसलेले होते. श्री. कृष्णमूर्ति यांचा व आगामी जगद्गुरुंचा विशेष संबंध आहे. तेव्हां अदृश्य प्रक्रिया प्रत्यक्ष पाहून बसविलेला हा पूजाविधि हिंदुधर्मास अत्यंत उपकारक असून जगद्गुरुंच्या आगमनानंतर हिंदुधर्माच्या पुनरुज्जीवनाच्या कार्यांत तो विधि पुष्कळच उपयोगी पडेल असें मानण्यास हरकत नाहीं.

## नवीन भाग

हीं पूजा सामुदायिक आहे हा तींमधील नवीन भाग होय. एकेकट्यानें स्वतंत्र रीतीनें पूजा करावी असा हिंदुधर्माचा जुना परिपाठ आहे. पण हल्लींच्या कालमानास सामुदायिक पूजा अवश्य असल्यावरून या पूजेची मांडणी तशा प्रकारची मुद्दाम करण्यांत आली आहे. जेव्हां एकटा उपासक उपासना करितो तेव्हां उपास्याकडून उपासकाकडे. अदृश्य भूमिकांवरून एक प्रेरणा येते व त्या प्रेरणेनें त्याचें हित होतें. पण जेव्हां अनक उपासक उपासना करितात तेव्हां एक मोठी प्रचंड प्रेरणा त्या सर्व उपासकांकडे येते. ही शक्ति विशेष प्रकारानें सांठविण्याची व मग ती जोरानें सर्वत्र फेंकण्याची योजना पुढील पूजाविधींत आहे. अर्थातच उपासकांकडे आलेली प्रेरणा अध्यात्मदृष्ट्या त्यांस हितकर असते व त्यांनीं ती प्रेरणा सभोंवार सोडून दिली म्हणजे त्या प्रदेशांतील माणसांवरहि तिचा हितकर परिणाम होतो. पूजाविधींतील ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. मात्र तिचें महत्त्व कमी किंवा जास्ती करण्यांत शहाणपणा नाहीं. पुढील विधि योग्य प्रकारें व पुढें लिहिलेल्या सर्व सूचना लक्षांत ठेवून केला तर अंतरंगांतील भूमिकांवर परिणाम अवश्यमेव होतात; मग

ते उपासकास कळोत वा न कळोत. अज्ञ माणसानें नळाची तोटी फिर-विली तरी त्यांतून जसें पाणी येतें, तें येण्यास विद्वत्तेची किंवा नळाच्या रचनेच्या माहितीची जरूरी नसून नळाची तोटी कशी व किती फिरवावी इतक्याच माहितीची आवश्यकता असते, त्याप्रमाणें पुढील पूजाविधी-तील अदृश्य प्रक्रिया होण्यास धर्मातील खोल सिद्धान्तांची माहिती लागत नाहीं किंवा उपासना करणारा मनुष्य कोणी मोठा अधिकारी पुरुष असावा लागत नाहीं. ठराविक क्रिया ठराविक रीतीनें केल्या, त्यांतील सर्व सूचना व निर्बंध पाळले म्हणजे, तिचे अदृश्य परिणाम बिनबोभाट होतात. हें जरी खरें आहे तरी मनुष्य जितका सुशिक्षित व सद्वर्तनी असेल, जितक्या उत्सुकतेनें, ज्ञानानें, जितक्या टापटिपीनें व बिनचूक तो सर्व विधि करील, त्याची जितकी श्रद्धा व मनाचा एकाग्रपणा असेल त्या मानानें तो विधि अधिक परिणामकारक होईल हेंहि तितकेंच खरें आहे. कांहीं मंत्र नादप्रधान असतात, तर कांहीं म्हणणाराच्या मनाच्या एकाग्रतेवर, त्याच्या श्रद्धेवर आणि त्याच्या निर्धारशक्तीवर अवलंबून असतात. पुढील विधींत नादप्रधान मंत्र नसून हे दुसऱ्या जातीचे मंत्र आहेत. अर्थात् लक्ष न देतां हा विधि केला तर त्याचा परिणाम व्हावयाचा नाहीं. उलटपक्षीं उपासना करणारीं माणसें मनानें एकाग्र व सामर्थ्य-वान् असलीं, आणि त्यांनीं विधि नीट समजूनउमजून केला तर त्याचा विशेष परिणाम होईल हें विसरतां कामा नये. दुसरें असें कीं, अंत-रंगांतील प्रेरणा आपण एखाद्या वेळेस पूजा करून उत्पन्न केल्या किंवा एकाद्या वेळेसच विशिष्ट प्रदेशावर सोडल्या तर त्याचा फारसा उपयोग नाहीं. सबंध आयुष्यांत एकदां स्वच्छ हवेंत फिरावयास गेल्यानें किंवा दूध प्याल्यानें कोणीहि पहिलवान होत नाहीं, त्याप्रमाणें पूजेंतील प्रेरणा एकादे वेळीं उत्पन्न केल्यानें त्यांचा फारसा फायदा होणार नाहीं. पण मनुष्य जर त्या प्रेरणा नियमानें व पुनः पुन्हा उत्पन्न करून त्याचा बुद्धिपुरस्सर स्वतःस व दुसऱ्यांस फायदा करून देत असेल तर झाडास रोज नियमानें पाणी घातल्यानें तें जसें कालांतरानें मोठें प्रचंड झाड

होतें, त्याप्रमाणें नियमानें असे विधि जे वारंवार करीत राहतील त्यांच्या अंतरंगांत आध्यात्मिक जीवन पुनःपुन्हा येत राहील व एकंदरींत कालावधीनें त्याचा परिणाम फारच मोठा होईल.

या पूजाविधींची जी माहिती येथें आम्ही देत आहों ती सर्व निरनिराळ्या ठिकाणांहून गोळा केलेली आहे. त्यांत आमच्या पदरचें असें कांहीं नाहीं स्थळसंकोचास्तव ती सर्व माहिती थोडक्यांत आणिलेली आहे. मंत्रांचे जे अर्थ दिले आहेत ते पांडित्याच्या दृष्टीनें दिलेले नाहींत; तर एकंदर मथितार्थ लक्षांत येण्यासाठीं दिलेले आहेत. या मंत्रांत काव्याचा भाग बराच आहे. तो सहृदय अंतःकरणानें पाहिला पाहिजे; व मंत्र म्हणतांना सहृदयतेनें तो मनांत आणिला पाहिजे. यासाठीं अर्थ देतांना नीरस पांडित्य केलेलें नाहीं. खालील मंत्र नादप्रधान नाहींत, अर्थप्रधान आहेत, यासाठीं ते म्हणतांना **अर्थाकडे अवश्य लक्ष पाहिजे. मनाच्या निर्धारानें ते म्हटले पाहिजेत, नाहीं तर ते अगदीं निष्फळ होतील व ही पूजा म्हणजे एक निर्जीव कवाईत होईल** हें कोणीहि विसरतां कामा नये.

पूजा अनेक पुजारी एकदम करितात. त्यांपैकीं एक अध्वर्यु असतो व बाकीचे साहाय्य करितात. अध्वर्यु पुरुषच असला पाहिजे असें नाहीं. **स्त्रीनें अध्वर्यूचें काम केलें तर तेंही पुरुषासारखेंच परिणामकारक होत असतें.** ह्या सर्वांनीं एकाग्र अंतःकरणानें पूजाविधि करावयाचा असतो. नुसतें अध्वर्यूनें लक्षपूर्वक सर्व करावयाचें व बाकीच्यानीं निर्जीवपणें त्याची री ओढावयाची असें चालणार नाहीं. सर्वांनीं सारख्याच निश्चयानें व श्रद्धेनें आपलें मन एकाग्र करणें अत्यवश्य आहे. यांपैकीं अध्वर्यु दीपाशीं बसतो. बाकीचे त्याच्या सभोंवार अर्धवर्तुलाकार बसतात. श्रोते जरा पलीकडे बसतात. अध्वर्यूजवळ दीप किंवा समई असते. देवालयांत पूजा करावयाची असल्यास ती समई देवळांतील गाभाऱ्यांत वेदीवर असते व अध्वर्यु जवळच बसलेला असतो. गाभा-

त्याच्या बाहेर येण्यास जो दरवाजा असतो त्याच्याबाहेर बाकीचे उपासक चौफेर किंवा वाटोळे बसतात. अध्वर्यूनें म्हणावयाच्या मंत्रांच्या प्रारंभीं पुढील वर्णनांत " अध्वर्यु " व सर्व उपासकांनीं म्हणावयाच्या मंत्राच्या प्रारंभीं " सर्व " असें घातलें आहे. पूजेच्या प्रत्येक भागास निराळें शीर्षक दिलें आहे. मंत्र म्हणतांना करावयाच्या क्रिया त्याच ठिकाणीं दिल्या आहेत. मंत्राचा अर्थ कंसांत दिला आहे आणि नंतर विशेष माहिती व सूचना व टीपा बारीक अक्षरांत दिल्या आहेत.

## या पूजेचा हेतु

सर्व उपासकांनीं स्नान करून पूजेस सुरवात करावयास पाहिजे. अंग स्वच्छ असावयास पाहिजे व श्रद्धेची भावना पाहिजे. नाहींतर अंगांतून अदृश्य प्रेरणा वाहूं शकत नाहींत. अर्थात् विधि चालू असतां कोणतेंहि वायफळ बोलणें किंवा विचार वर्ज आहेत. उपासकांमध्यें व श्रोत्यांमध्यें स्त्रिया व ब्राह्मणेतरांचा समावेश करण्यास आडकाठी नाहीं. या पूजेचा हेतु उच्च भूमिकांवरील दैवी शक्ति भूलोकांत आढून ती सभोंवार पसरावयाची आहे. त्याचा फायदा अध्वर्यु, पुरोहित, श्रोते व आसमंतात् त्या प्रदेशांतील माणसें यां सर्वांच्यावर होतो. उपासकांच्या देहांतून ती शक्ति वहावयाची असते. यासाठीं प्रथम जो संकल्प करतात त्याचें कार्य उपासक व पूजेची जागा ( देऊळ ) सर्व मंडळी शुद्ध व्हावीं हें असतें.

## ( १ ) संकल्पः—

**अध्वर्यु :-**

**हरिः ओम्**

**अपवित्रः पवित्रो वा सर्वावस्थांगतोऽपि वा ।**
**यः स्मरेत्पुंडरीकाक्षं सबाह्याभ्यंतरश्शुचिः ॥**

( अर्थ—हरिः ओम्। मनुष्य पवित्र वा अपवित्र असो, कोणत्याहि स्थितींत असो. ज्यानें पुंडरीकाक्ष ईश्वराचें स्मरण केलें, तो बाह्यतः व अंतरंगामध्यें शुद्ध होतो. )

[ **टीप**—हा मंत्र अध्वर्यूनें म्हणतांना ईश्वराचें स्मरण केलें पाहिजे, आपण स्वतः व इतर सर्व मंडळी शुद्ध होत आहेत असा मनाचा जोराचा निश्चय ठेविला पाहिजे. सर्व उपासकांनीं त्याचवेळीं हीच भावना निश्चयपूर्वक मनांत ठेविली पाहिजे तरच हें शुद्धिकार्य होतें.

हा मंत्र म्हटल्यावर अध्वर्यु प्रत्येक उपासकांच्या उजव्या हातांत प्राशनार्थ पळीनें जल देतो. पुढचा मंत्र संपेपर्यंत सर्वजण तें तसेंच आपल्या हातांत धरतात व तें मंत्रानें पुनीत झाल्यावर त्यांचें सर्व एकदम आचमन करितात. ]

**सर्व**—

**ओम् सूर्यश्च मा मन्युश्च मन्युपतयश्च मन्युकृतेभ्यः पापेभ्यो रक्षन्ताम्। यद्रात्र्या पापमकार्षम्। मनसा वाचा हस्ताभ्याम्। पद्भ्यामुदरेण शिश्ना। रात्रिस्तदवलुंपतु। यत्किंच दुरितं मयि। इदमहं माममृतयोनौ। सूर्ये ज्योतिषि जुहोमि स्वाहा।**

[ सर्व एकदम आचमन करतात. ] (तै. आ. १०·४९)

( अर्थ—ओम्। सूर्य, मनःशक्ती व मनःशक्तीचे अधिपति हे मनानें केलेल्या पापापासून माझें रक्षण करोत. मी रात्रीं मनानें, वाचेनें, हाता-पायांनीं, पोटासाठीं किंवा विषयवासनेमुळें जें पाप केलें असेल, तें रात्रीनें नष्ट करावें. माझ्यामध्यें जें पाप असेल त्याचा आणि माझ्या स्वतःचा, अमृतत्वाची जणूं जी मूस त्या सूर्यामध्यें, त्या ज्योतीमध्यें, मी यज्ञ करितों. )

[ **टीप**—या क्रियेस अघमर्षण ( पापक्षालन ) म्हणतात. हा मंत्र निश्चयपूर्वक म्हटला पाहिजे. ' इद्महम् माममृतयोनौ, ' ह्यापासून पुढचा भाग म्हणत असतांना, मी स्वतःचा यज्ञ करीत आहें, सूर्यरूपी अमृतत्वाच्या मुशींत मी जात असून शुद्ध होत आहें, तसेंच हातांतलें पाणी सूर्याच्या सामर्थ्यानें अभिमंत्रित होत आहे अशी मनाची कल्पना ठेविली पाहिजे. एकाग्रतेनें आणि निश्चयानें हे मंत्र म्हटले तरच सर्वजण शुद्ध होऊन पूजाविधीस योग्य होतात.

येथवर सर्वजण शुद्ध झाले. आतां पुढें पूजास्थान (देऊळ) शुद्ध करावयाचें त्यासाठीं अध्वर्यु घंटानाद करीत पुढील मंत्र म्हणतो ]

( अध्वर्यु घंटा नाद करितो )

**अध्वर्युः—**

**ओम्। आगमार्थं तु देवानां गमनार्थं तु रक्षसाम्।**
**कुर्वे घंटारवं तत्र देवताव्हानलांछनम्॥**
**अपसर्पंतु ते भूता ये भूता भूमिसंस्थिताः।**
**ये भूता विघ्नकर्तारस्ते गच्छन्तु शिवाज्ञया॥**
**अपक्रामंतु भूतानि पिशाचाः सर्वतो दिशम्।**
**सर्वेषामविरोधेन ब्रह्मकर्म समारभे॥**

( अर्थ—ओम्। देव यावेत व राक्षस जावेत यासाठीं देवांच्या आमंत्रणाची खूण म्हणून मी घंटानाद करतों. या भूमींवर असलेलीं जीं भूतें तीं निघून जावोत. जीं भूतें विघ्न करितात तीं शिवाच्या आज्ञेनें दूर जावोत. भूतें व पिशाचें सर्व दिशांस निघून जावोत. म्हणजे सर्वांचा अविरोध होऊन हें ब्रह्मकर्म मला करितां येईल. )

[ **टीप**—भूर्लोक, भुवर्लोक व स्वर्लोक आदि सर्व सूक्ष्म लोक, एकमेकांत एकत्र मिसळलेले असून हे सर्व सूक्ष्म लोक आपणांसभोंवतीं विस्तरलेले असतात. या लोकांत बरे वाईट; सुष्ट दुष्ट; अनेक जीव असतात. जे चांगले असतात त्यांस देवदेवता, व वाईट असतात त्यांस भूत, राक्षस, पिशाच, अशीं नांवें आहेत. देव[1]-

---

१ **टीप**—देवकोटीसंबंधी माहिती लेडबीटरकृत THE ASTRAL PLANE या पुस्तकांत—आवृत्ति १९४१—पृ. १०२—१०८—THE DEVAS—या सदराखालीं दिलेली आढळेल. तसेंच जेफ्रे हॉडसनकृत KINGDOM OF THE GODS या पुस्तकांत देवांची माहिती असून सूक्ष्मदृष्टि असणाऱ्या माणसास देवदेवता कशा दिसतात त्यांची चित्रें ही दिलीं आहेत. डॉ. अनि बेझंटकृत EVOLUTION OF LIFE AND FORM या पुस्तकांतील FUNCTION OF THE GODS वरील व्याख्यानांत देवांचे विविध प्रकार व त्यांची सृष्टींतील कार्यें याबद्दल उपयुक्त माहिती सांपडेल.

कोटींत अनेक पायऱ्या आहेत. वरच्या पायरीवरील देव ज्ञानी व मोठे अधिकारी असतात. खालच्या पायरीवरील देव अल्पज्ञ पण वरच्यांच्या तंत्रानें वागणारे असतात. ज्या ठिकाणी पूजाविधि करावयाचा त्या ठिकाणीं सूक्ष्म भूमिकेवरील

## देवांस बोलाविण्याचा हा मंत्र आहे

वातावरणहि शुद्ध पाहिजे. म्हणून देवांस बोलाविण्याचा हा मंत्र आहे. राक्षस, पिशाच वगैरे घाणेरडे जीव त्या ठिकाणीं अडथळा करितात, म्हणून ते तेथें नको असतात. हा मंत्र योग्य प्रकारें लक्ष लावून म्हटला म्हणजे देवदेवता येतात व पिशाचादि जातात. फार शक्तीचे देव बोलविण्याचा किंवा फार शक्तीचीं भूतें घालविण्याचा येथें प्रश्न नसतो. देव व भूतें या कोटींपैकीं कनिष्ठ दर्जाच्या व्यक्तींचा या मंत्राशीं संबंध असतो. हीं भूतें माणसाचें मन व त्याच्या सभोंवतालचें वातावरण मलिन करीत असतात. या मंत्रानें तीं दूर जाऊन देवकोटींतील जीव त्या ठिकाणीं येतात. मंत्र म्हणतांना ते येत आहेत व वाईट व्यक्ति जात आहेत, अशी कल्पना केली पाहिजे. शिवाच्या आज्ञेनें तीं जातात असें म्हणतांना मनांत निश्चय ठेविला पाहिजे व मंत्रांच्या उच्चारानें आपण त्यास घालवीत आहोंत, अशी जोराची भावना अध्वर्यु व इतर सर्व उपासकांनी ठेविली पाहिजे.

## मंत्रांचे प्रकार व कार्य

मंत्र म्हटला म्हणजे तदनुसार गोष्टी कशा घडून येतात असा कोणास प्रश्न पडेल. निरनिराळ्या मंत्रांचीं कार्यें निरनिराळ्या रीतीनें होत असतात. कांहीं मंत्रांनीं विशेष प्रकारचे ध्वनि उत्पन्न होऊन त्या ध्वनींपासून सभोंवतालीं आंदोलनें व आकृति उत्पन्न होतात व त्या कार्य करितात. असले ध्वनिप्रधान मंत्र ( ओम् खेरीज करून ) या पूजाविधींत नाहींत. कांहीं मंत्र म्हणतांना माणसाच्या मनः-सामर्थ्यानें परिणाम होत असतात. मनांत भावना किंवा विचार आला की, वासनादेह व मनोदेह यांत आंदोलन उत्पन्न होतें, तें सर्वत्र पसरतें व आकृतिहि उत्पन्न* होतात. या आंदोलनांचा व आकृतींचा परिणाम होऊन इष्ट कार्य घडत असतें. कांहीं मंत्र सांकेतिक असतात. माणसानें आपल्या नाकासमोर आपली तर्जनी

---

*या गोष्टींचा विचार "आत्मविद्येचीं मूलतत्त्वें" या पुस्तकांत जिज्ञासूंनीं पहावा. लेडबीटरकृत Thought Forms या पुस्तकांत या विषयाचा अधिक ऊहापोह असून अदृश्य भूमिकांवरील आकृतींचीं त्यांत चित्रेंहि आहेत.

उभी धरली तर दुसऱ्यास "चूप बस" असें तो सांगत आहे असें आपण समजतों. त्या तर्जनींत कांही जोर आहे म्हणून दुसरा मनुष्य चूप बसतो असें नाहीं, तर नाकासमोर तर्जनी उभी धरली तर 'गप्प बस' असें सांगण्याचा तो संकेत आहे इतकेंच. अशा प्रकारचे अनेक संकेत अनादिकालापासून चालत आलेले आहेत. कोणी तरी परमज्ञानी पुरुषानें सृष्टिनियमांचा नीट विचार करून ते घालून दिलेले असावेत. सूक्ष्म लोकांतील व्यक्तींस ते पूर्वापारपासून माहीत असल्यामुळें त्या व्यक्ति ते ओळखतात. देवकोटींतले कनिष्ठ जीव आपल्या वरिष्ठांच्या तंत्रानें वागतात व ते हे संकेत ओळखून ठराविक क्रिया करितात. त्या क्रिया करण्यामध्यें त्यांस स्वभावतःच आनंद वाटतो. विशिष्ट प्रकारची पावसाळी हवा झाली म्हणजे जसे त्या वेळीं स्वभावतःच काजवे चमकूं लागतात, त्याप्रमाणें विशिष्ट परिस्थिति सूक्ष्म भूमिकेवर उत्पन्न झाली किंवा विशिष्ट हस्तविक्षेप माणसानें केला किंवा विशिष्ट मंत्र म्हणण्यांत आला, तर संकेत म्हणून भुवर्लोकांतील व्यक्ति विशिष्ट कार्यें करितात. तीं कार्यें करणें त्यांस स्वभावसिद्ध असतें व त्यांस त्यांत निसर्गतः आनंद वाटत असतो. अनेक मंत्रांचें कार्य असल्या संकेतानुसार होत असतें व हे संकेत धर्मांतील परमज्ञानी पुरुषांनीं आपल्या अधिकारानुसार ठरवून टाकिले असल्यामुळें ते आपोआप पाळले जातात. मंत्रांचे असे अनेक प्रकार आहेत. अर्थात् ठराविक निर्बंध पाळले आणि संकेत नीटपणें केले तरच हे मंत्र परिणामकारक होतील, एरव्हीं त्यांचा उपयोग नाहीं हें उघड आहे.]

( संकल्पानंतर दिग्बंध येतो. )

## ( २ ) दिग्बंध.

[ **टीप**—दिग्बंध म्हणजे दिशांचा बंध. जसा आपण एकादा हॉल बांधतों आणि त्या हॉलला भिंती असल्यामुळें आंतली जागा सुरक्षित रहाते आणि वाटेल त्यास त्या हॉलच्या जागेमध्यें येतां येत नाहीं, तद्वत् ज्या ठिकाणीं आपण पूजा करीत असतों त्या ठिकाणीं सूक्ष्म द्रव्याच्या जणूं भिंती बांधल्या जाऊन त्यामुळें वाईट शक्तींस व वाईट व्यक्तीस त्या ठिकाणीं येण्यास जणूं प्रतिबंध करणें, या क्रियेस दिग्बंध म्हणतात. या दिग्बंधित अवकाशांत वाईट शक्तींस येतां येत नाहीं; पण चांगल्या शक्तींस आंत येतां येतें. या अवकाशांतच मंत्र म्हणण्यांत येतात व

म्हणणाऱ्यांचे सद्विचार व सद्भावना यांनी सूक्ष्मद्रव्यापैकीं योग्य प्रकारचें द्रव्य त्या अवकाशांतच भरलें जातें. मंत्रांनींहि कांहीं शक्ति त्याच ठिकाणीं सांठविण्यांत येनात. देवदेवताही त्या जागेंत आपली शक्ति ओततात. या जागेस सूक्ष्मद्रव्याचे चोहोंबाजूनें बांध घातले असल्यामुळें, पुष्कळ शक्ति त्या ठिकाणीं या पूजाविधि-मध्यें संचित होते व शेवटीं हे बांध फोडून—दिङ्मोक्ष करून—ती शक्ति सर्वत्र पसरावयाची असते. ]

**अध्वर्युः—ओम् भूः भुवः स्व*ः। ( इति दिग्बंधः )**

**( अर्थ—ओम् भूलोक, भुवर्लोक व स्वर्गलोक )**

[ **टीपः**—हे शब्द अध्वर्यु म्हणतो तीं **तीन लोकांचीं नांवें** आहेत. हा मंत्र संकेतपूर्ण आहे. आणि तो म्हटल्यावर सभोंवतालीं जें सूक्ष्मद्रव्य असतें, त्याच्या जणूं चौफेर भिंती बांधल्या जातात. या भिंती प्रमुखतः ईथर ह्या द्रव्याच्या असतात. पण भुवर्द्रव्य व स्वर्द्रव्य हेंहि त्यांत अंशतः असतें. मंत्र म्हणतांना दिग्बंध करणाऱ्या भिंती उभारल्या जात आहेत असा म्हणणाराचा निश्चय पाहिजे. देवळांत पूजा चालू असली तर देवळाच्या सभोंवार व देवळाच्याच आकाराच्या या सूक्ष्मद्रव्याच्या भिंती उभारल्या जातात. मग हळूहळू जशी पूजा पुढें चालत जाईल त्याप्रमाणें त्या दिग्बंधित जागीं एक मोठें विचारचित्र ( thought--form ) बांधण्यांत येतें. दिग्बंध म्हणजे या भावी विचारचित्राचा प्रारंभ होय असें म्हटलें तरी चालेल. ]

---

* **टीप**—" ओम्, भूः, भुवः, स्वर् "—हे शब्द प्राचीन काळीं जाणते अध्वर्यु ज्ञान व निश्चयपूर्वक कसे उच्चारीत व स्वतःची व सभोंवतींच्या माणसांची जाणीव भूलोकांपासून—भुवर्लोक व स्वर्गलोकांपर्यंत क्रमाक्रमानें कशी नेत याचें वर्णन—हिंदुस्थानांतील हजारों वर्षांपूर्वींचा एक लोकोत्तर धार्मिक विधि आपल्या सूक्ष्म दृष्टीनें प्रत्यक्ष पाहून श्री. लेडबीटर यांनीं INNER LIFE—Vol. 1 पृष्ठें २०३—२०४ वर—दिलेले आहे. तें वाचल्यास सदरहू शब्द उच्चारतांना उपासकांचे मनांत कोणता हेतु व किती निर्धार ( WILL ) असला पाहिजे ते ध्यानांत येईल. तसेंच या क्रियेचा उपासकांवर किती शुभ परिणाम होत असे तेही लक्ष्यांत ठेवण्याजोगें आहे.

## ( ३ ) धूप :

अध्वर्यु :—


ॐ येन देवाः पवित्रेण । आत्मानं पुनते सदा ।
तेन सहस्रधारेण । पावमान्यः पुनन्तु मा ॥
प्राजापत्यं पवित्रम् । शतोद्यामं हिरण्मयम् ।
तेन ब्रह्मविदो वयम् । पूतं ब्रह्म पुनीमहे ॥
इंद्रः सुनीती सह मा पुनातु ।
सोमः स्वस्त्या वरुणः समीच्या ॥
यमो राजा प्रमृणाभिः पुनातु मा ।
जातवेदा मोर्जयन्त्या पुनातु ॥ ( तै. ब्रा. १·४·७·६ )

( अर्थ—ज्या पवित्रपणानें देव सदा आत्म्याला शुद्ध करितात, त्या सहस्रधारांच्या पवित्र प्रवाहानें मी शुद्ध होत आहें. प्रजापतीची शेंकडों मार्गांनीं येणारी हिरण्मय अशी जी पवित्र शक्ति आहे, तिनें पवित्र ब्रह्म जाणणारे आम्ही ब्रह्मज्ञानी लोक सर्वांस शुद्ध करितों. इंद्र मला योग्य मार्ग दाखवून शुद्ध करो. सोम आपल्या सुखानें, वरुण आपल्या कुशाग्र-दृष्टीनें आणि यम राजा आपल्या विध्वंसक शक्तीनें मला शुद्ध करोत. अग्नि मला आपल्या संवर्धक शक्तीनें शुद्ध करो. )

[ **टीप**—हा मंत्र म्हटल्यावर आध्वर्यु धूप घेऊन तो फिरवितो. दिग्बंधाच्या पूर्वीच्या मंत्रानें आपण आपल्या अंगांतील मलिनपणा काढून टाकिला व नंतरच्या ह्या मंत्रानें त्या जागीं पवित्रपणा स्थापित केला. धूपानें वातावरण आल्हादकारक करण्यांत येतें. वरिल मंत्रांत अनेक देवांचें आवाहन आहे. इंद्र, वनस्पतिकोटींचा अधिपति सोम, बंधनकारक कर्मांचा नाश करण्यास साहाय्य देणारा यम व अंतस्तेज देणारा अग्नि यांची प्रार्थना आहे. ही निश्चयपूर्वक व त्या त्या देवाची शक्य ती कल्पना मनांत आणून केली पाहिजे. अध्वर्यु धूप घेऊन त्याची पवित्र शक्ति भोंवतीं सर्वांवर पसरावी अशा बुद्धीनें तो धूप फिरवितो.

### देवळाचें सूक्ष्म चित्र

दिग्बंध झाल्यानंतर पुढील मंत्र म्हटले जात असतांना सूक्ष्म द्रव्याचें एक जंगी विचारचित्र हळूहळू तयार होत जातें. त्याचा आकार देवळापेक्षां जरा मोठा असतो.



पृ. १२–अड्यार येथील 'ज्योतिरालय' देवळाचें
सूक्ष्म दृष्टीनें दिसणारें विचारचित्र

तें विचारचित्र पूर्ण झालें म्हणजे कसें दिसतें त्याची कल्पना येण्यासाठीं या पुस्तकांत लगन एक आकृति दिलेली आहे. तींत देवळाचा दृश्य भाग, अर्थात् पायऱ्या, जोतें, खांब, छपर, घुमट व गाभाऱ्याचा दरवाजा हीं सर्व काळ्या छायेनें दाखविलेलीं आहेत. हें देऊळ अड्यार येथील होय. पूजा सुरू होणाऱ्या अगोदर हेच भाग अस्तित्वांत असतात. पूजा सुरू होऊन दिग्बंध झाला म्हणजे देवळाच्याच आकाराचें सूक्ष्म द्रव्याचें एक जंगी चित्र सर्व देऊळभर हळूहळू उत्पन्न होऊं लागतें. तें पूर्ण झालें म्हणजे कसें दिसतें त्याची कल्पना देवळासभोंवतीं काढलेल्या सोबतच्या चित्रांतील रूपरेषेनें येईल. चित्रांतील काळसर रंगाच्या देवळाभोंवतीं जी रूपरेषा आहे ती त्या सूक्ष्म द्रव्याच्या चित्राची आहे. छापलेल्या चित्रांत दाखविलें आहे त्याप्रमाणें हें तयार झालेलें सूक्ष्म द्रव्याचें चित्र पोकळ नसून त्यांत सूक्ष्म द्रव्य भरलेलें असतें व तें नाना रंगांनी विभूषित असतें. ते सर्व रंग सूर्योदयाच्या किंवा सूर्यास्ताच्या आकाशांतल्या रंगासारखे तेजस्वी असतात. कागदावर काढलेल्या चित्रांतील रंगासारखे हे रंग मळकट असत नाहींत. शुभ्र, पीत व नील हे रंग ह्या विचारचित्रांत प्रामुख्यानें असतात; पण निळा रंग एकंदरींत अधिक असतो. सूक्ष्म द्रव्याच्या चित्राची लांबीरुंदी देवळाच्यापेक्षां जरा अधिक असते. सूक्ष्म द्रव्याचा घुमट मात्र त्या देवळाच्या दृश्य घुमटासारखा वाटोळा नसून मनोऱ्यासारखा आणि पुष्कळच अधिक उंच असतो; व मुख्य मनोऱ्याच्या खालीं तीन लहान मनोरे असतात. या सूक्ष्म द्रव्यांत भुवर्द्रव्य व मनोद्रव्य यांचा भरणा अधिक असतो. जमलेली मंडळी हा विधि करीत असतांना त्यांच्या भक्तिभावानें जें चांगल्या प्रकारचें सूक्ष्म द्रव्य सभोंवतालच्या वातावरणांत उत्पन्न होत असतें त्यापासून ही आकृति बनत असते. बोलाविलेल्या देवदेवता हें द्रव्य घेऊन त्यापासून वरील प्रकारची आकृति पायरीपायरीनें बनवीत असतात. देवदेवता कांहीं द्रव्याची स्वतःहि भर घालतात; आणि या आकृतींत नंतर अदृश्य प्रेरणा ओतल्या जाऊन त्या प्रेरणांनीं ती आकृति जगूं गच्च भरून जात असते. अर्थात् मंडळीचा भक्तिभाव, निश्चय वगैरेंनीं जें सूक्ष्मद्रव्य निर्माण केलें जातें त्यापासून ही जंगी आकृति बनत असल्यामुळें पूजेकडे दुर्लक्ष केल्यास किंवा मनाची वृत्ति पाहिजे तशी न ठेविल्यास ही आकृति नीट होणार नाहीं हें उघड आहे. अवश्य त्या योग-सिद्धि असलेल्या माणसास ही आकृति स्पष्ट दिसते. ती पाहूनच वरील चित्र काढलेलें आहे. अर्थात्च चित्र असावें तसें चांगलें

नाहीं, त्यांत रंग घालतां आलेले नाहींत. पण मुळींच चित्र न देण्यापेक्षां या चित्रानें थोडी तरी कल्पना येईल म्हणून हें चित्र दिलें आहे.

दिग्बंधाच्या वेळीं ईथरमय द्रव्याच्या भिंती उभारल्या जातात. धूपाचा सुवास पसरूं लागला म्हणजे देवळाच्या स्थूल खांबांस अंतर्बाह्य व्यापणारे ईथरमय द्रव्याचे खांबहि हळूहळू उभारले जाऊं लागतात. ]

**सर्वे–ओम् भूः। ओम् भुवः। ओम् सुवः। ओम् महः। ओम् जनः। ओम् तपः। ओम् सत्यम् । ओम् तत्सवितुर्वरेण्यम् भर्गो देवस्य धीमहि। धियो यो नः प्रचोदयात्। ओम् आपो ज्योती रसोऽमृतम् ब्रह्मभूर्भुवस्सुवर् ओम्।** ( ऋ. ३ • ४ • १० )

( अर्थ–ओम् भूलोक, भुवर्लोक, स्वर्गलोक, महर्लोक, जनोलोक, तपोलोक, सत्यलोक ) ओम्-आम्ही सूर्यदेवाचें जें परमपवित्र तेज त्याचें ध्यान करितों. तो आमच्या बुद्धीला तेजस्वी करो. ओम् आप, ज्योति, रस, अमृत, ब्रह्म, भूलोक, भुवर्लोक-स्वर्ग-लोक-ओम् )

[ **टीप**—ओम् भूः भुवः स्वः वगैरेनीं सुरुवात करून वरील सर्व भाग सर्वांनीं म्हणावयाचा असतो. भूः भुवः स्वः वगैरे हीं एकाहून एक सूक्ष्म असणाऱ्या सात लोकांची नांवें आहेत. हीं नांवें घेत असतांना विसर्गाचा उच्चार मृदु करावा, कठोर करूं नये. पुढें गायत्री म्हटली जाणार आहे, याची पूर्वतयारी म्हणून हीं लोकांची नांवें म्हणतात, व त्याबरोबर एक ऊर्मि सभोंवार उत्पन्न होते. विसर्गाचा उच्चार कठोर केल्यास ती ऊर्मि नीट उत्पन्न न होतां तिच्या परिघांत तुटकपणाचे जणूं दांते उत्पन्न होतात.

## गायत्रीचा परिणाम

पुढें गायत्री सर्वांनीं म्हणावयाची असते. ती अर्थ लक्षांत आणून म्हटली पाहिजे. ती तशी म्हटली तर अत्यंत मौजेचे व आश्चर्यकारक परिणाम होतात. गायत्री हा मंत्र अनादि काळापासून चालत आलेला असून देवदेवतांच्या चांगल्या परिचयाचा आहे. आपल्या सूर्यमालेचा एक महान् अधिपति असून अंतरंगाच्या दृष्टीनें पाहिल्यास त्या अधिपतीचा मुख्य केंद्र म्हणजे दृश्य सूर्य हा आहे. गायत्री लक्ष लावून म्हटली म्हणजे सूर्यापासून एक तेजाची शलाका येऊन ती म्हणणा-

राच्या अंतरंगांत शिरते. सूर्य क्षितिजाच्या वर असला तर ती त्यापासून सरळ म्हणणाऱ्याच्या अंगापर्यंत येते. तो क्षितिजाच्या खालीं असला तर पृथ्वीच्यामधून ती आरपार येते. ही शलाका किंचित् पिंवळी पण एकंदरींत शुभ्र असते. अंगांत आल्यावर त्या मनुष्याचें अंतरंग जणूं तिनें भरून जातें व ती लगेच म्हणणाऱ्याच्या अंगांतून त्याच्यासमोर सात निरनिराळ्या रंगांच्या मार्गांनीं सुरळ्यांनीं बाहेर येते. हे मार्ग त्याच्या देहापाशीं मोठे असतात व प्रत्येक निमुळता होत जाऊन शेवटी त्यांस अत्यंत तेजस्वी टोंक येतें. समोर दुसरा एखादा मनुष्य असला तर यापैकीं एक टोंक जिवंत ज्वालेप्रमाणें जरा पुढें मागें होऊन त्याच्या मेंदूंत वा अंतःकरणांत शिरतें व तेथें आत्मसदृश प्रेरणा उत्पन्न करते. पुष्कळ मंडळींनी जवळ जवळ बसून एकत्र गायत्री म्हटली तर त्यांचे सर्व सूक्ष्म देह कांहीं वेळ परस्परांत मिसळतात व प्रत्येकाकडे सूर्यापासून निराळी एक एक शलाका न येतां एकच मोठी रुंद शलाका त्या सर्वांमध्यें येते व सर्वांसमोरून एकंदर सात मोठ्या प्रेरणा प्रकट होतात. हें सर्व होण्यास गायत्रीच्या अर्थाकडे लक्ष लावून ती म्हटली पाहिजे. संस्कृत भाषेंतच ती म्हटली पाहिजे असें नाहीं. हें सर्व प्रकार सूक्ष्म भूमिकांवर होतात व ती दृष्टि असणाऱ्यास ते दिसतात. या प्रक्रियेनें गायत्री म्हणणारास अंतरंगाच्या दृष्टीनें साहाय्य होतें, चित्तशुद्धीचा व प्रगतीचा त्याचा मार्ग चालणें त्यास किंचित् सुलभतर होतें आणि सभोंवतालच्या माणसांवरहि योग्य दिशेचा परिणाम होतो.

हीं गायत्री म्हणतांना सूर्याची कल्पना मनांत आणून मनांत निश्चयाची भावना ठेविली पाहिजे. त्या वेळीं मन शांत व निश्चयपूर्ण पाहिजे. ही गायत्री या वेळीं सर्वांनीं मोठ्यानें एकदम म्हणावयाची असते. सर्व एक आहोंत अशीहि त्या वेळीं भावना हवी. पूजेच्या वेळीं जी सद्वृत्ति गायत्रीनें स्वतःच्या अंतर्यामीं उत्पन्न होईल ती, पुनः पुन्हा पूजा करून आपल्या स्वभावांत अष्टौप्रहर दृढमूल करण्याचा माणसाचा उद्योग पाहिजे. तरच या शक्तीचा कायमचा व विशेष असा उपयोग होईल.

## श्री. जिनराजदासांनीं केलेला गायत्रीचा अर्थ

गायत्री मंत्राचा पुढील अर्थ प. वा. श्री. सी. जिनराजदासांनीं भारतसमाज पूजेवरील आपल्या इंग्रजी पुस्तकांत पृ. ९ वर पुढीलप्रमाणें दिलेला आहे. तो अभ्यासकांस उपयुक्त वाटेल.

"A better rendering of this most sacred verse of Hinduism, obligatory on all twice-born Hindus to repeat each morning, is: 'We meditate on the wondrous glory of Savitri our God; may He inspire our meditations.' Equally effective, though not strictly literal, is: 'We pour ourselves in supreme devotion to the wondrous glory of Savitri our God; may He intensify our devotion.' As I and another repeat the Gayatri together though we use the Sanskrit words our thought is not "meditation," but " we pour out supremest devotion" and there is no prayer for response, exeept an inexpressible longing to be with Him. for ever and ever, bathed in His "bhargo" or "Light".

(अर्थ—हिंदु धर्मांतील या अत्यंत पवित्र व प्रत्येक द्विज हिंदूच्या रोजच्या प्रातः कालच्या आवश्यक पठनांतील पद्याचे जास्त चांगले भाषांतर पुढीलप्रमाणें करतां येईल. "आम्ही आमच्या सवितृ देवाच्या भव्य तेजाचें-चिंतन करतों- तो आमच्या चिंतनाला स्फूर्ति देवो." जरी शब्दशः बरोबर नसले तरी तितकेंच प्रभावी दुसरें भाषांतर येणें-प्रमाणें करतां येईल. "आमच्या सवितृ देवाच्या महनीय तेजाला आम्ही आमची परम भक्ति अर्पण करतों." मी व माझा जोडीदार मिळून जेव्हां गायत्री मंत्राचा उच्चार करतो तेव्हां संस्कृत शब्द आम्हीं जरी वापरीत असलों तरी आमची भावना चिंतनाचे स्वरूपाची नसते. तर आम्हीं त्यावेळीं आमची पराकाष्ठेची भक्ति व्यक्त करीत असतो व परत कांहीं तरी मिळावें अशी त्यांत प्रार्थना नसते. तर सवितृ देवाच्या तेजांत निमज्जन करून त्यांचेमध्यें सदैव लीन होऊन रहाण्याची अनिर्वचनीय भावना मात्र तेव्हां शिल्लक उरलेली असते.)

यानंतर पुढीलप्रमाणें देवतांस आवाहन करतात—

## ( ४ ) देवेभ्य आह्वानम्—अग्निदेवताः

अध्वर्युः—ओम् भूः भुवस्सुवः ( इति अग्निप्रतिष्ठापनम् )

ओम् चत्वारि शृंगा त्रयो अस्य पादा
द्वे शीर्षे सप्तहस्तासो अस्य।
त्रिधा बद्धो वृषभो रोरवीति
महोदेवो मर्त्यां आविवेश॥
एष हि देवः प्रदिशोऽनु सर्वाः
पूर्वो हि जातः स उ गर्भे अंतः।
सविजायमानः स जानिष्यमाणः
प्रत्यङ्मुखास्तिष्ठाति सर्वतो मुखः॥

सर्वे—ओम् अग्नये स्वाहा। अग्नय इदं न मम॥
ओम् सूर्याय स्वाहा। सूर्यायेदं न मम॥
ओम् प्रजापतये स्वाहा। प्रजापतय इदं न मम॥

ओम्—अग्ने नय सुपथा राये अस्मान्
विश्वानि देव वयुनानि विद्वान्।
युयोध्यस्मज्जुहुराणमेनो
भूयिष्ठां ते नम उक्तिं विधेम॥
मित्रस्य चर्षणीधृतः श्रवो देवस्य सानसिम्।
सत्यं चित्रश्रवस्तमम्॥
मित्रो जनान् यातयाति प्रजानन्
मित्रो दाधार पृथिवीमुतद्याम्।
मित्रः कृष्टीरानिमिषाऽभिचष्टे
सत्याय हव्यम् घृतवद्विधेम॥
प्र स मित्र मर्तो अस्तु प्रयस्वान्
यस्त आदित्य शिक्षाति व्रतेन।
न हन्यते न जीयते त्वोतो नैन-
मंहो अश्नोत्यन्तितो न दूरात्॥ ( तै. सं. ३-४-११-४ )

( अर्थ—अध्वर्यु म्हणतो-ओम् भूः भुवः सुवः। ( या वेळीं अग्नि पेटवितात ) अग्नीला चार शिंगें आहेत, त्याला तीन पाय आहेत. त्याला दोन मस्तकें आणि सात हात आहेत. तीन प्रकारांनीं बांधलेला हा नंदी मोठ्यानें फुस्कारतो. हा मोठा देव मर्त्यांमध्यें आलेला आहे. हा देव सर्व दिशांमध्यें आहे. हा पूर्वींच जन्मलेला आहे व तो अद्यापि गर्भांत आहे तो आतां जन्मत आहे, जन्मास येणार आहे. अंतर्मुख असा जो तो सर्व बाजूंना तोंडें करून रहातो.

सर्व म्हणतात—( हें इंधन अग्नीला दिलें आहे, माझें राहिलें नाहीं. हें सूर्याला दिलें आहे, आतां हें माझें राहिलें नाहीं. हें प्रजापतीला दिलें आहे, आतां हें माझें राहिलें नाही. हें अग्ने, चांगल्या मार्गानें आम्हांस विपुल साधनांकडे ने. हे देवा, तुला सर्व मार्ग माहीत आहेत. वांकड्या मार्गास आम्हांस जीं आमचीं पापें लावतात त्यांचा नाश कर. आम्ही तुला पुनः पुन्हा ' नमो नमः ' म्हणतों. माणसांचें धारण करणारा जो मित्र त्याची कीर्ति मोठी आहे. अनंत प्रकारची कीर्ति असणारा जो सत्यस्वरूपी मित्र त्याची मी पूजा करितों. मित्र जाणता असून माणसांस मार्गास लावितो. तो पृथ्वी आणि स्वर्ग यांचा आधार आहे. मित्र माणसांकडे एकसारखा पहात असतो. त्या सत्यस्वरूपी मित्राला ही घृतमिश्रित आहुति मी देतों. हे मित्रा, हे अदितिपुत्रा तुझ्या नियमानें जो चालेल त्याला विपुल साधनें मिळोत. तूं ज्याचा रक्षण करणारा असशील तो मरत नाहीं, त्यास अपजय नाहीं, त्याला दुरून वा जवळून पाप स्पर्श करीत नाहीं. )

[ **टीप**—' ओम् भूः भुवः सुवः ' असें अध्वर्यु म्हणून अग्नि पेटवितो. चार शिंगें, तीन पाय वगैरे काव्यमय वर्णन दृश्य अग्नीचें आहे. तें म्हणतांना अध्वर्यु व इतर उपासक यांनीं स्वतः कवि होऊन अग्नीची कल्पना मनासमोर आणावयाची आहे. अग्नि पेटविला जात असतांनाच हा अध्वर्यूनें मंत्र म्हणावयाचा आणि सर्वांनीं त्या काव्यमय वर्णनाकडे लक्ष देऊन तो अग्निदेव खरोखरीच त्या पेटविलेल्या अग्नींत

येत आहे अशी निश्चयपूर्ण मनानें कल्पना करावयाची आहे. पूर्वी अग्नि पेटवितांना भला मोठा आवाज होई हें वर्णनावरून दिसतें. कारण बैलाच्या फुस्कारण्यासारखा अग्नीचा आवाज होतो, असें वर मंत्राचें वर्णन आहे. हा मंत्र म्हटला म्हणजे खरोखरीच अग्निदेव त्या अग्नींत येऊन त्याला पवित्र करतो. पुढें सर्व उपासक प्रार्थना करितात. अग्नींत घातलेलें इंधन अग्नीला अर्पण केलें, आतां तें माझें राहिलें नाहीं, इत्यादि म्हणतात. आपण जणूं तें इंधनच आहों व आपण स्वतः स्वतःस अग्नीला वाहात आहों, अशी मनांत कल्पना पाहिजे. सूर्य व प्रजापति यांनाहि तसलेंच आत्मार्पण नंतर आहे. मित्र हें नांव अग्नीचें आहे. प्रजापति म्हणजे सूर्याच्या अंतरंगांतील शक्ति. अग्नीनें आपणाला योग्य मार्गानें न्यावें, पापाचें क्षालन करावें, त्याचे नियम जो पाळील त्यास इहपरलोकीं सुख मिळतें अशा अर्थाचे मित्रास अनुलक्षून मंत्र आहेत व ते म्हणतांना भक्तिपूर्ण मन असलें पाहिजे. भक्तिभावानें एक विशेष प्रकारचें निळ्या रंगाचें सूक्ष्म द्रव्य आंदोलित होऊन सभोंवतीं जमतें व या द्रव्याचा उपयोग विचारचित्राच्या बांधणीकरितां देवदेवता करून घेतात. भक्तिभाव नसेल तर तें द्रव्य तयार होणार नाहीं. देवदेवता त्याची बांधणी करीत आहेत हा भावहि आपण एकसारखा मनांत ठेविला पाहिजे. या वेळीं त्या विचारचित्रांत पुष्कळ मनोद्रव्याची भर पडत असते. भक्तिभावाचें द्रव्यहि या वेळीं पुष्कळ येतें. विचारचित्राची या वेळीं पुष्कळ अधिक बांधणी होऊन त्याचें छतहि तयार होतें. पण अद्यापि त्याचे मनोरे अस्तित्वांत आलेले नसतात.

(या वेळीं अग्नींत पळी घालून ती अध्वर्यु सर्व उपासकांच्या समोर नेतो व प्रत्येक उपासक आपल्या अनामिकेनें किंचित् रक्षा घेतो व पुढें दिलेल्या मंत्रानें देहांतल्या चक्रांस ती लावितो.)

**सर्वे–ओम् भूः इति शिरसि । ओम् भुवः इति ललाटे । ओम् सुवः इति कंठे । ओम् महः इति नाभौ । ओम् जनः इति हृदये । ओम् तपः इति वामस्कंधे । ओम् सत्यम् इति दक्षिणस्कंधे । ओम् तत्सवितुर्वरेण्यम् भर्गो देवस्य धीमहि धियो यो नः प्रचोदयात् । ओम् आपो ज्योती रसोमृतम् ब्रह्मभूर्भुवस्सुवरोम् । इति पुनः शिरसि ।**

अर्थ–ओं भूः ( असें म्हणून डोक्याच्यावर रक्षा त्याच बोटानें लावणें ); ओं भुवः ( भुवयांच्या मध्यें लावणें ); ओम् सुवः ( कंठास लावणें ); ओम् महः ( नाभीस ); ओम् जनः ( हृदयास ); ओम् तपः ( डाव्या खांद्यास ); ओम् सत्यम् ( उजव्या खांद्यास ); शेवटीं पुनः डोक्यावर अनामिका ठेवणें. पुढें गायत्रीमंत्र आहे, व त्याचा अर्थ पूर्वी दिलाच आहे. हा गायत्रीचा भाग म्हणतांना अनामिकेची रक्षा डोक्याच्या वर लावावयाची असते.

## प्राणमय कोषांतील चक्रें

[ **टीप**—डोक्याच्या वरचा भाग, भुवयांच्या मधचा भाग, कंठ, नाभी व हृदय या ठिकाणीं सूक्ष्म देहांत अनुक्रमें सहस्रार, आज्ञा, विशुद्ध, मणिपुर व अनाहत या नांवांचीं सूक्ष्मद्रव्याचीं चक्रें* आहेत. त्यांना चेतना उत्पन्न करण्यासाठीं हा विधि आहे. चेतना उत्पन्न झाली म्हणजे अदृश्य शक्ति शोषून घेण्याची शक्ति वाढते व ज्ञानशक्तिहि वाढते. त्या त्या चक्रास हात लावण्याच्या वेळीं त्यांत चेतना आपण रक्षेच्या सामर्थ्यानें उत्पन्न करीत आहों, अशी मनाची जोराची भावना पाहिजे. पुढें लगेच गायत्री म्हणतात. ती म्हटल्यावर अदृश्य भूमिकेवर कोणता प्रकार होतो तें वर आलेंच आहे. चक्रें जागृत झाल्यानें हा परिणाम माणसाच्या अंतरंगांत अधिक खोल भिनतो. डाव्या व उजव्या खांद्यांच्या ठिकाणीं चक्रें नाहींत. या प्रत्येक चक्रांतील शक्ति आपण ईश्वरार्पण करणार आहों असा वरील क्रियेचा अर्थ आहे. दोन्ही खांदे हे उद्योगक्रियेचें द्योतक म्हणून त्यांसहि रक्षास्पर्श करितात. या सर्व स्थानांस ओळीनें स्पर्श केला म्हणजे एकंदरींत ख्रिस्ती लोक आपल्या अंगासमोर जशी मोठी क्रॉसची खूण करतात तशीच खूण होते हें चाणाक्ष वाचकांच्या लक्षांत येईल. ही क्रॉसची खूण हिंदु वा ख्रिस्ती पद्धतीनें केली तरी ती मुळांत एकच असल्यामुळें अदृश्य सृष्टींत तिची ओळख पटून परिणामकारक होते. आतां पुढें आपोदेवतांस आवाहन करून बोलावतात. ]

---

* या चक्रांसंबंधीं सचित्र तपशिलवार व विश्वसनीय माहिती लेडबीटरकृत THE CHAKRAS या पुस्तकांत जिज्ञासूंस पहाण्यास मिळेल.

## ( ५ ) आपो देवताः

अध्वर्युः— ओम् दधिक्राव्णो अकारिषम्
जिष्णोरश्वस्य वाजिनः।
सुरभि नो मुखाकरत्
प्र ण आयूंषि तारिषत्॥ ( ऋग्वेद ४-६-३९ )

[ हा मंत्र म्हणतांना अध्वर्यु पाणी भांड्यांत ओततो. ]

( अर्थ —जो चपल व विजयी अश्व दधिक्रावण्, त्याच्या स्तुतीसाठीं हें मीं केलें आहे. तो आमचें तोंड गोड करो व आम्हांस जन्ममरणाच्या पलीकडे नेवो. )

[ **टीप**—आपोदेवता म्हणजे जलदेवता. जुन्या काळीं नदीच्या कांठीं बसून हा मंत्र म्हणत. फेंसाळ पाण्याची लाट जोरानें चाललेली पाहून त्यास कवि-प्रतिभेनें चपल अश्वाची उपमा दिली आहे. दधिक्रावण् हा शब्द पाण्यावरील फेस दह्यासारखा दिसतो असें सुचवितो. ]

( अध्वर्यु पाण्यावर हात धरतो व सर्व म्हणतातः— )

सर्वेः—ओम् आपो हि ष्ठा मयो भुव स्ता न ऊर्जे दधातन।
महे रणाय चक्षसे॥
यो वः शिवतमो रसस्तस्य भाजयतेह नः।
उशतीरिव मातरः॥
तस्मा अरं गमाम वो यस्य क्षयाय जिन्वथ
आपो जनयथा च नः। ( तै. सं. ४-१-५-२ )

( मग पुनः सर्वजण म्हणतातः— )

सर्वे—ओम् आपो वा इदं सर्वं विश्वभूतान्यापः प्राणा वा आपः पशव आपोऽन्नमापोऽमृतमापः सम्राडापो विराडापः स्वराडापश्छंदांस्यापो ज्योतींष्यापो यजूंष्यापः सत्यमापः सर्वा देवता आपो भूर्भुवः सुवराप ओम्। ( मैत्रायणोपनिषत् १४-१ )

(अर्थ—आप हो! आपण सुखाचें उगमस्थान आहां; त्यांनीं आम्हांस बलवान करावें, आणि मोठें व दिव्य दर्शन द्यावें. तुम्हांमध्यें जें अत्यंत पवित्र सत्त्व आहे त्याचा आम्हांस प्रेमळ मातांप्रमाणें वांटा द्या. त्यासाठीं आम्ही तुम्हांकडे त्वरेनें आलों आहों. हे आपो देवता! ज्यांच्या आनंदाकरितां तुम्ही आनंदित होतां त्यांना दीर्घायु करा.

हें सर्व आप आहे, सर्व भूतें आप आहेत, प्राण हा आप, पशु हे आप, अन्न हें आप, अमृत हें आप, ऐहिक शक्ति ही आप, विश्वशक्ति ही आप, आत्मशक्ति ही आप, सूक्तें हीं आप, ज्योति ही आप, संस्कार हे आप, सत्य हें आप, सर्व देवता ह्या आप, भूलोक, भुवर्लोक व स्वर्गलोक हींहि आप आहेत.)

(पुढें हात जोडून अध्वर्यु म्हणतोः—)

**अध्वर्युः—ओम् इमं मे वरुण श्रुधी हवमद्या च मृडय।**
**त्वामवस्युराचके॥** ऋग्वेद १-१५-१६
**तत्वा यामि ब्रह्मणा वंदमान-**
**स्तदाशास्ते यजमानो हविर्भिः।**
**अहेडमानो वरुणेह बो-**
**ध्युरुशंस मा न आयुः प्रमोषीः॥** ऋग्वेद १-२४-११
**यच्चिद्धि ते विशो यथा प्रदेव वरुणव्रतम्।**
**मिनीमसि द्यविद्यवि॥** ऋग्वेद १-२५-१
**यत्किंचेदं वरुण दैव्ये जनेऽ**
**भिद्रोहं मनुष्याश्चरामसि।**
**अचित्ती यत्तव धर्मा युयोपिम**
**मा नस्तस्मादेनसो देव रीरिषः॥** ऋग्वेद ७-८९-५
**कितवासो यद्रिरिपुर्न दीवि**
**यद्वाऽघा सत्यमुत यन्न विद्म।**
**सर्वा ता विष्य शिथिरेव देवा-**
**था ते स्याम वरुण प्रियासः॥** ऋग्वेद ५-८५-८

( अर्थ—ओम्, हे *वरुणा ! माझा हा धांवा ऐक आणि मला आज आनंदित कर. तुझ्या साहाय्याचा मी याचक आहे. या सूक्तानें तुला वंदन करून यजमान हवींनीं जें इच्छितों तें मी तुझ्यापासून इच्छितों. वरुणा, तूं क्रोध सोडून दे. सर्वांनीं स्तुत्य असा तूं आहेस. तूं आमचें आयुष्य तोडूं नकोस. वरुणा ! प्राकृत जनांप्रमाणें तुझे जे जे नियम आम्ही दररोज मोडतों; वरुणा, आम्ही माणसें जे नियमभंग करितों, अज्ञानानें तुझ्या धर्माचें अतिक्रमण करतों, त्या पापाबद्दल, हे देवा, तूं आम्हांस शिक्षा करूं नकोस. जेव्हां खोटें बोलणारे लोक आम्हांवर पापांचा आरोप करतात, किंवा जेव्हां तीं पापें खरीं असतात, पण अज्ञानतः केलेलीं असतात, तेव्हां, हे देवा, त्या सर्व पापांचे बंध सैल करून सोडून टाक म्हणजे आम्ही, हे वरुणा, तुला प्रिय राहूं. )

[ **टीप** — हा सर्व अर्थ उघड आहे. पाण्यावर हात धरून मंत्र म्हणतांना देवतांची शक्ति पाण्यामध्यें जात असून त्यानें पाणी भारलें जात असतें. हा विचार त्या वेळी मनांत ठेविला पाहिजे. 'आपोहिष्ठा' हा मंत्र म्हणतांना त्या मंत्रांत सांगितलेले चांगले गुण आपण त्या पाण्यांत बद्धमूल करीत आहों अशी भावना ठेवावी. पाण्यामध्यें ते येत आहेत अशी दृढ भावना निश्चयानें ठेविली म्हणजे पाणी त्या त्या शक्तीनीं अभिमंत्रित होतें. 'आपो वा इदं सर्वम्' या मंत्रांत सृष्टींतील सर्व उत्कृष्ट गोष्टी व त्यांचे गुण आपरूप आहेत असें म्हटलें आहे. 'इमं मे वरुणं श्रुधी' या मंत्रांत आपण चुका करीत असतों व वरुणानें त्यांचे बंध तोडावे व आपणांस

---

* **टीप** — ग्रीक लोक ज्यास औरेनॉस व रोमन लोक ज्यास युरेनस म्हणत, त्यास वेदांत वरुण देव असें नांव आहे. मोठ्या विस्ताराचा (GREAT EXPANSE) —स्वर्गाचा—तो देव आहे असें वेदानें मानलें आहे. तो विश्वसृष्टीचा कर्ता असून अत्युच्च नीतीनें व अर्पण बुद्धीनें वागण्यास त्याजकडून स्फूर्ति मिळते. तसेच सर्व पापांचा चोख हिशेब घेणारा तो असला तरी तो करुणाघन आहे, असे वैदिक वरुणाचें वर्णन आहे.

ही माहिती भारतसमाज पूजेच्या प. वा. सी. जिनराजदासांनीं संपादिलेल्या इंग्रजी आवृत्तीचें पृ. १२ वरच्या तळ टीपेंत दिलेली आहे.

मोकळें करावें ही कल्पना आहे. या सर्व मंत्रांच्या अर्थाकडे भक्तिपूर्ण लक्ष पाहिजे.

हे सर्व मंत्र म्हटले जात असतांना विश्वारचित्रांत आपोद्रव्याची–अर्थात् भुवर्लो-कांतल्या द्रव्याची–विशेष भर पडते. यापूर्वी त्यांत मुख्यतः ईथर द्रव्य व मनोद्रव्य हीं असतात. ]

( वरील मंत्र म्हणतांना उत्पन्न झालेल्या शक्ति व गुण आपल्या अंतरंगांत जाऊन त्यांनीं आपण शुद्ध व्हावें, यासाठीं पुढील मंत्र सर्व म्हणतात. अध्वर्यु अभिमंत्रित जलाचें सभोंवार सिंचन करतो. )

**सर्वेः–ओम् प्राणापानव्यानोदानसमाना मे शुध्यंताम् ज्योतिरहं विरजा विपाप्मा भूयासं स्वाहा ॥**

**ओम् पृथिव्यप्तेजोवाय्वाकाशा मे शुध्यंताम् ज्योतिरहं विरजा विपाप्मा भूयासं स्वाहा ॥**

**ओम् शब्दस्पर्शरूपरसगंधा मे शुध्यंताम् ज्योतिरहं विरजा विपाप्मा भूयासं स्वाहा ॥**

**ओम् मनोवाक्कायकर्माणि मे शुध्यंताम् ज्योतिरहं विरजा विपाप्मा भूयासं स्वाहा ॥**

**ओम् अन्नमय–प्राणमय–मनोमय–विज्ञानमय–आनंदमया मे शुध्यंताम् ज्योतिरहं विरजा विपाप्मा भूयासं स्वाहा ॥**

**ओम् आत्मा मे शुध्यंताम् ज्योतिरहं विरजा विपाप्मा भूयासं स्वाहा ॥**

**ओम् अंतरात्मा मे शुध्यंताम् ज्योतिरहं विरजा विपाप्मा भूयासं स्वाहा ॥**

**ओम् परमात्मा मे शुध्यंताम् ज्योतिरहं विरजा विपाप्मा भूयासं स्वाहा ॥**

( हात जोडून पुढील भाग म्हणावयाचा )

**ओम् भूः । ओम् भुवः । ओम् सुवः । ओम् महः । ओम् जनः । ओम् तपः । ओम् सत्यम् । ओम् तत्सवितुर्वरेण्यम् भर्गो देवस्य धीमहि । धियो यो नः प्रचोदयात् । ओम् आपो ज्योती रसोमृतम् ब्रह्मभूर्भुवस्सुवर् ओम् ॥**

(अर्थ—ओम्, माझे प्राण, अपान, व्यान, उदान, समान* हे शुद्ध होवोत. मी ज्योतिस्वरूप आहें. मी निष्कलंक व निष्पाप होवो, स्वाहा. ओम् माझ्यामधील पृथिवी, आप्, तेज, वायु, आकाश हे शुद्ध होवोत. मी ज्योतिस्वरूप आहें, इत्यादि. ओम् माझे शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हे शुद्ध होवोत. मी ज्योतिस्वरूप आहे, इत्यादि. ओम् माझें मन, वाचा, काया, कर्म हीं शुद्ध होवोत. मी ज्योतिस्वरूप आहे, इत्यादि. ओम् माझे अन्नमय, मनोमय, प्राणमय, विज्ञानमय, आनंदमय (कोष) हे शुद्ध होवोत. मी ज्योतिस्वरूप आहे, इत्यादि. ओम् माझा आत्मा शुद्ध होवो. मी ज्योतिस्वरूप आहे, इत्यादि. माझा अंतरात्मा शुद्ध होवो. मी ज्योतिस्वरूप आहे, इत्यादि. ओम् माझा परमात्मा शुद्ध होवो. मी ज्योतिस्वरूप आहे, इत्यादि. पुढील गायत्री—प्रमुख भागाचा अर्थ वर आलाच आहे.)

[ **टीप** : जलसिंचन करीत असतांना हा अन्तःशुद्धीकरणाचा भाग म्हणावयाचा आहे. आपले पंचप्राण, आपल्या देहांतील पृथ्वी आदिकरून तत्त्वें, आपलीं शब्द, स्पर्श वगैरे जाणणारीं इंद्रियें, मन, वाचा, क्रिया, अन्नमयादि पांच कोश, आपला आत्मा, अंतरात्मा, परमात्मा वगैरे शुद्ध व्हावेत यांसाठीं हे अनेक मंत्र आहेत. हे म्हणतांना अर्थ ध्यानांत ठेवून व मनाचा निश्चय करून ते ते भाग शुद्ध होत आहेत अशी निर्धाराची भावना असली पाहिजे. नुसती आपलीच शुद्धता नव्हे तर सर्वांची होत आहे हाहि विचार मनांत असावा. पूर्वीच्या मंत्रांनीं उत्पन्न झालेल्या शक्ति व म्हणणाराचा निर्धार या दोहोंनीं हें शुद्धिकार्य होत असतें. दर मंत्राच्या शेवटीं मी ज्योति आहें व निष्कलंक व निष्पाप होत आहें, असें ध्रुवपद आहे. आत्मा ही ज्योति आहे, मी ज्योति आहें, हा विचार दर ध्रुवपद म्हणतांना मनांत निश्चयपूर्वक असावयास पाहिजे. आपल्या अंतर्यामांतील अणुरेणु सर्व निखालस

---

* **टीप** —सूर्याच्या द्वितीय स्वरूपा पासून (Second LOGOS ASPECT OF THE SUN) निघून हे प्राणाचे प्रवाह मनुष्याच्या स्थूल शरीरांतील ज्ञानतंतूंतुन वहातात व शरीर सुस्थितींत ठेवतात. जास्त तपशिलवार वर्णन लेडबीटर-कृत THE CHAKRAS या पुस्तकांत दिलें आहे ( जिनराजदासांचे भा. स. पूजेचे इंग्रजी आवृत्ति पृ. १४ वरून )

शुद्ध करण्याचा मनाचा निश्चय हवा. या निश्चयानें उत्पन्न होत असलेल्या शक्ति आपल्या अंतर्यामांत भिनून जातात. लगेच पुढें हात जोडून गायत्री म्हणतात व सूर्यापासून आपल्या शुद्ध झालेल्या अंतरंगांत शक्ति येते आणि तिचा अंतरंगांत परिणाम होऊन ती पुन्हा पूर्वी सांगितल्याप्रमाणें सात प्रवाहांनीं बाहेर प्रगट होते.

पूजेचा भाग चालू असतांना बराच वेळपर्यंत एकसारखी हळूहळू विचारचित्रा-मध्यें अदृश्यशक्ति ओतली जात असते; आणि त्याची परमावधि पुढील तेजोदेवतांच्या आवाहनांत होते. इतका वेळ अग्निदेवता व वरुणदेवता यांचें आवाहन झालें. त्याचा परिणाम मुख्यतः भूलोक व भुवर्लोक यांवर होतो. पुढील तेजोदेवतांच्या आवाहनमंत्रांच्या वेळीं भुवर्लोकातील कार्य पुरें होऊन स्वर्लोकांतील कार्यास सुरुवात झालेली असते. ]

## ( ६ ) तेजो देवताः

( पुढील मंत्र म्हणत असतांना अध्वर्यु समईनें निरंजन लावितो. )

अध्वर्युः—ओम् आसत्येन रजसा वर्तमानो
निवेशयन्नमृतं मर्त्यं च ।
हिरण्ययेन सविता रथेना
ऽऽ देवो याति भुवना विपश्यन् ॥ ऋग्वेद १-३५-२
उद्वयं तमसस्परिपश्यन्तो ज्योतिरुत्तरम् ।
देवं देवत्रा सूर्यमगन्म ज्योतिरुत्तमम् ॥ ऋग्वेद १-५०-१०
उदु त्यं जातवेदसं देवं वहन्ति केतवः
दृशे विश्वाय सूर्यम् ॥ ऋग्वेद १-५०-१
चित्रं देवानामुदगादनीकं
चक्षुर्मित्रस्य वरुणस्याग्नेः ।
आप्रा द्यावापृथिवी अंतरिक्षं
सूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्च ॥
ऋग्वेद १-११५-१-तै सं. २-४-१४

**सर्वे–ओम् आर्द्रं ज्वलति ज्योतिरहमस्मि। ज्योतिर्ज्वलति ब्रह्माहमस्मि। योऽहमस्मि ब्रह्माहमस्मि। अहमस्मि ब्रह्माहमस्मि। अहमेवाहं मां जुहोमि स्वाहा॥ ( महानारायणोपनिषत् ५ )**

( अध्वर्यु या वेळीं निरंजनांतील ज्योति चिमट्यानें उचलून समईतील मूळ ज्योतीस मिळवितो. )

**सर्वे–ओम् भूः ओम् भुवः । ओम् सुवः। ओम् महः। ओम् जनः। ओम् तपः। ओम् सत्यम्। ओम् तत्सवितुर्वरेण्यम् भर्गो देवस्य धीमहि। धियो यो नः प्रचोदयात्। ओम् आपो ज्योती रसोमृतम् ब्रह्म भुर्भूवः सुवर् ओम्।**

( अर्थ–अंतराळांतून पुढेंमागें प्रवेश करणारा व मर्त्य आणि अमर्त्य यांस चैतन्य देणारा सवितृदेव सोन्याच्या रथांतून भुवनांची पहाणी करीत जातो. तमाच्या वरून या उत्तम ज्योतीला पहाणारे आम्ही या सवितृदेवाचें, या उत्तम ज्योतींचें अंतस्थ स्वरूप जाणून घेऊं. या सवित्याला त्याचे किरण वर उंच धरतात. अशाकरितां कीं, तो सूर्य सर्वांस दिसावा. देवांचें हें आनंददायक बिंब उगवलें आहे. मित्र, वरुण व अग्नि यांचा तो डोळा आहे. पृथ्वी, स्वर्ग व मधील अंतरिक्ष हीं त्यानें भरून टाकिलीं आहेत. सूर्य हा चराचर जगताचा आत्मा आहे.

ही ज्योति धगधगीतपणें ज्वलन करीत आहे. मी ज्योति आहें. ज्योति ज्वलन करीत आहे. मी ब्रह्म आहें. जो मी आहें तो ब्रह्म आहे. ब्रह्म मी आहें. मी स्वतः माझें आत्मसमर्पण करितों. )

पुढील भागाचा ( ओम् भूः इत्यादि गायत्रीचा ) अर्थ पूर्वी दिला आहे.

[ **टीप**—हे मंत्र सूर्योदयाच्या वेळचे आहेत. सूर्य नुकतांच उगवत आहे हें मंत्र म्हणणारा बघत आहे. आनंदपूर्ण अंतःकरणानें व हृदय उचंबळून येऊन कवीच्या दृष्टीनें तो जगाची पाहणी करणाऱ्या, सोन्याच्या रथांतून जाणाऱ्या सूर्यबिंबाकडे पाहात आहे. हा मंत्र म्हणतांना माणसानें क्षणभर कवि बनलें पाहिजे. सर्वांच्या अंतर्यामीं सर्वांचा अधिपति जो ईश्वर तो आहे अशी त्याची

भावना असली पाहिजे. जमत असेल तर पूजा अशा वेळीं केली पाहिजे कीं या मंत्राच्या वेळीं सूर्य वर येतांना दिसेल. सूर्य हा येथें तेजोदेवतांचा प्रतिनिधि होय.

शेवटीं तेज, ज्योति, म्हणजे मी स्वतः होय असें सांगणारा मंत्र आहे व तो म्हणतांना मी स्वतः ज्योतिस्वरूप आहे, हा विचार मनांत ठेविला पाहिजे. या मंत्राच्या प्रारंभीं समईपासून निरंजन लावितात. त्या ईश्वरी तेजापासून आपण निघालों आहों याची आठवण करण्यासाठीं हा भाग आहे. पुढें निरंजनाची वात समईच्या वातीशीं एकरूप करतात. आपण शेवटी त्या ईश्वरी ज्योतींत जाणार आहों याची आठवण करावी यासाठीं ही क्रिया आहे. अर्थातच या क्रियांच्या वेळीं त्या त्या गोष्टींचें माणसानें स्वतःस स्मरण करून दिलें पाहिजे.

पुनः गायत्री म्हणण्यांत येते. वरील मंत्रानें जी शक्ति उत्पन्न झालेली असते ती गायत्रीच्या क्रियेनें अंतरंगांत भिनते. गायत्रीची अदृश्य क्रिया कोणती तें वर आलेंच आहे. ]

## ( ७ ) ध्यानम्

( ताटांत कापूर लावून सर्व मंडळी उभ्यानें पुढील शिवस्तुतीचे मंत्र म्हणतात )

**सर्वे–ओम् सहस्रशीर्षा पुरुषः । सहस्राक्षः सहस्रपात् ।**
**स भूमिं विश्वतो वृत्वा । अत्यतिष्ठद्दशांगुलम् ॥**
**पुरुष एवेदं सर्वम् । यद्भूतं यच्च भव्यम् ।**
**उतामृतत्वस्येशानः । यदन्नेनातिरोहति ॥**
**एतावानस्य महिमा । अतो ज्यायांश्च पूरुषः ।**
**पादोऽस्य विश्वाभूतानि । त्रिपादस्यामृतं दिवि ॥** ऋग्वेद १०-९
**ओम् तद्विष्णोः परमं पदं सदा पश्यन्ति सूरयः ।**
**दिवीव चक्षुराततम् ॥**
**तद्विप्रासो विपन्यवो जागृवांसस्समिन्धते ।**
**विष्णोर्यत्परमं पदम् ॥** ऋ. १-२२-२०-२१

**ओम् नमस्तेअस्तु भगवन् विश्वेश्वराय महादेवाय त्र्यंबकाय त्रिपुरांतकाय त्रिकाग्निकालाय कालाग्निरुद्राय नीलकंठाय मृत्युंजयाय सर्वेश्वराय सदाशिवाय श्रीमन्महादेवाय नमः॥** (तैत्तिरीय आरण्यक ४–२८–१)

(अर्थ—ओम् पुरुषाला हजार मस्तकें, हजार डोळे व हजार पाय आहेत. तो सर्व भूमीला व्यापून वर दहा आंगुळें उरलेला आहे. हें जें सर्व आहे, जें उत्पन्न झालेलें आहे व जें पुढें उत्पन्न होणार आहे, तें सर्व पुरुष आहे. तो अमृतत्त्वाचा स्वामी आहे आणि जें जें अन्नानें वाढतें त्याचाही स्वामी आहे; इतका त्याचा महिमा आहे- याच्यापेक्षांहि तो अधिक थोर आहे. त्याचा पाव भाग म्हणजे सर्व भूतें होत. बाकीचे तीन भाग अमर असून उच्चलोकांत आहेत. तें विष्णूचें परमपद आहे. स्वर्गलोकांत विस्तृत असा डोळा जसा असावा त्याप्रमाणें ज्ञानी लोक त्यास सदा पाहात असतात. शहाणे, भक्तिमान्, जागृत असलेले लोक विष्णूचें तें जें परमपद त्याचा जयजयकार करितात. ओम् भगवान् विश्वेश्वराला, महादेवाला, त्र्यंबकाला, त्रिपुरान्तकाला, त्रिकाग्निकालाला, कालाग्निरुद्राला, नीलकंठाला मृत्युंजयाला, सर्वेश्वराला, सदाशिवाला, श्रीमन्महादेवाला नमस्कार असो.)

(कापुराच्या ज्योतींचें ताट सर्वांसमोर फिरवितात व प्रत्येकजण त्या ज्योतीवर हात धरतो. मग सर्व जमलेल्या मंडळीमध्यें एक फुलाची परडी फिरविली जाते. तींतून प्रत्येकजण एकदोन फुलें घेतो व पुढील नारायण (विष्णु) स्तुतीचा मंत्र म्हणण्यांत येतो.)

## ध्यानम्

(पुष्पांजलिः)

**सर्वे-ओम् सहस्रशीर्षं देवं विश्वाक्षं विश्वशंभुवम्**
**विश्वं नारायणं देवमक्षरं परमं पदम्॥ १॥**

**विश्वतः परमं नित्यं विश्वं नारायणं हरिम्।**
**विश्वमेवेदं पुरुषः तद्विश्वमुपजीवति॥ २॥**

पतिं विश्वस्यात्मेश्वरं शाश्वतं शिवमच्युतम् ।
नारायणं महाज्ञेयं विश्वात्मानं परायणम् ॥ ३ ॥
नारायणः परं ब्रह्म तत्त्वं नारायणः परः ।
नारायणः परो ज्योतिरात्मा नारायणः परः ॥ ४ ॥
नारायणः परो ध्याता ध्यानं नारायणः परः ॥ ५ ॥
यच्च किंचिज्जगत्सर्वं दृश्यते श्रूयतेऽपि वा ।
अंतर्बहिश्च तत्सर्वं व्याप्य नारायणः स्थितः ॥ ६ ॥
अनंतमव्ययं कविं समुद्रेन्तं विश्वशंभुवम् ।
स ब्रह्मा स शिवः स हरिः सेन्द्रः सोऽक्षरः परमः स्वराट् ॥ ७ ॥

(महानारायण उपनिषद्)

ओम् तद्ब्रह्म । ओम् तद्वायुः । ओम् तदात्मा । ओम् तत्सत्यम् । ओम् तत्सर्वम् । ओम् तत्पुरोर्नमः ॥ अंतश्चराति भूतेषु गुहायां विश्वमूर्तिषु । त्वं यज्ञः त्वं वषट्कारः त्वमिन्द्रः त्वं रुद्रः त्वं विष्णुः त्वं ब्रह्मा त्वं प्रजापतिः । त्वं तदाप आपो ज्योती रसोमृतं ब्रह्म भूर्भुवस्सुवर् ओम् ॥

ओम् ऋतं सत्यं परं ब्रह्मं पुरुषं कृष्णपिंगलम् ।
ऊर्ध्वरेतं विरूपाक्षं विश्वरूपाय वै नमः ॥

( येथें सर्व मंडळी एकानंतर एक अशीं फुलें वाहतात )

अर्थ—हे ! सहस्रमस्तकें असणाऱ्या व सर्व विश्वाला पाहाणाऱ्या देवा, सर्वांस आनंद देणाऱ्या विश्वरूपा, नारायणा, देवा, अक्षरा, परमपदा ! सर्वांहून श्रेष्ठ, नित्य असलेल्या व विश्वांत भरून राहिलेल्या नारायणाची, हरीची, मी उपासना करितों. विश्व म्हणजेच पुरुष आहे व त्या पुरुषामुळें विश्व जिवंत असतें. विश्वाचा पति, स्वतःचा ईश्वर, शाश्वत, शिव व अच्युत, नारायण, ज्ञेयामध्यें सर्वांत मोठा, विश्वाचा आत्मा व सर्वश्रेष्ठ निवासस्थान असा जो, त्याची मी उपासना करितों. नारायण परब्रह्म होय; नारायण परमतत्त्व होय; नारायण परमज्योति होय; नारायण परमात्मा होय; नारायण हा मोठा ध्यान

करणारा होय, नारायण हें मोठें ध्यान होय. जें जें जगत् दिसतें वा ऐकावयास येतें त्या सर्वांस नारायण आंतबाहेर व्यापून राहिलेला असतो. हा जो अनंत, अव्यय, ज्ञानी, जीवनसागराच्या पलीकडचा कांठ व विश्वाच्या सुखाचा झरा, तोच ब्रह्मा होय, तोच शिव होय, तोच हरि होय, तोच इंद्र होय; तो अक्षर आहे, सर्वथा स्वयंप्रकाश आहे.

ओम्! तो ब्रह्म आहे, तो वायु आहे, तो आत्मा आहे, तो सत्य आहे, तो सर्व आहे. त्या मोठ्या देवाला माझा नमस्कार असो.

तो सर्व पदार्थांमध्यें भूतांच्या अंतर्यामीं हृद्‌यगुहेंत फिरतो. तूं यज्ञ आहेस, तूं वषट्कार आहेस, तूं इंद्र आहेस, तूं रुद्र आहेस, तूं विष्णु आहेस, तूं ब्रह्मा आहेस, तूं प्रजापति आहेस, तूं तें आहेस. आप, ज्योति, रस, अमृत, ब्रह्म, भूर्लोक, भुवर्लोक व स्वर्लोक आहेस. ओम् तूं खरें आहेस, सत्य आहेस, परब्रह्म आहेस, कृष्णवर्णी व पिंवळा आहेस, सदा ब्रह्मचारी आहेस, विविध दृष्टींचा आहेस, विश्वरूप आहेस, तुला नमस्कार असो.)

[ **टीप**—हे सर्व वरील मंत्र ध्यानाचे आहेत. ते म्हणतांना ईश्वराचें मनांत ध्यान करणें जरूर आहे. वरील मंत्राचे दोन भाग पडतात. कापराचें तबक फिरविण्यापूर्वींचे शिवस्तुतीचे मंत्र व तबक फिरवून झाल्यावर मंडळींनीं फुलें घेतल्यावरचे नारायण ( विष्णु ) स्तुतीचे मंत्र. दोन्हीं मंत्र, ईश्वराचें वर्णन करितात. ते भक्तिपूर्ण अंतःकरणानें म्हटले पाहिजेत. ईश्वराची स्तुति म्हणत असतांना मंत्राच्या अर्थाकडे सहृदयपणानें लक्ष लाविलें पाहिजे. अशा रीतीनें भक्तिभावानें ते मंत्र म्हटले म्हणजे आरंभीं विचारचित्राच्या वरच्या भागांत, चित्रांत दाखविल्याप्रमाणें, मनोरा उत्पन्न होतो. मंत्रांतील शिवाचीं नांवें घेत असतांना एक नीलवर्णी देव गाभाऱ्यांत वेदीवर आसनमांडी घालून बसतो. सोबतच्या चित्रांतील गाभाऱ्याचा भाग अगदीं काळा झालेला आहे. अर्थात् त्यामुळें त्या देवाचें चित्र तेथें दाखवितां आलेलें नाहीं. पुढें कापराचें तबक फिरविलें जातें. त्या वेळीं कापराच्या ज्योतींतून येणारी शक्ति प्रत्येक माणसानें आपल्या हाताच्या बोटांनीं शोषून घ्यावयाची असते. अर्थात् माणसानें आपण शक्ति शोषीत आहों, अशी भावना ठेविली पाहिजे. फुलें वांटल्यावरच्या मंत्राच्या वेळींहि भक्तिरसानें मन भरलेलें पाहिजे. त्या वेळीं विचार-

चित्राचा मनोरा व छत यांमध्यें शक्ति भरत असते व नक्शी वगैरे भूषणांनीं तें चित्र अलंकृत होतें. फुलें मस्तक विनम्र करून वहावयाचीं असतात. त्या वेळीं मनांत पूर्ण भक्ति पाहिजे. फूल म्हणजे मी स्वतः होय व मी स्वतःला, आपल्या सर्वस्वाला ईश्वरार्पण करीत आहें, अशी भावना पाहिजे. असें करतांना समईतील ज्योतींतून अदृश्य प्रेरणा निघून ती प्रत्येक उपासकाच्या अंगांत शिरते व आध्यात्मिक सामर्थ्य व धैर्य हीं त्याच्या अंगांत त्यामुळें खरोखरीच प्रेरित होतात, व तो शेवटचा प्रसाद घेण्यास पात्र होतो.

कापुराचें तबक फिरविण्याच्या पूर्वीच्या मंत्रांत आरंभीं पुरुषसूक्त आहे. त्याचा अर्थ कवीच्या दृष्टीनें केला पाहिजे. नीरस पांडित्यानें अर्थ केल्यास रसहानि होईल. पुरुषास हजार डोळे, हजार मस्तकें आहेत, याचा शब्दशः अर्थ करणें वेडेपणाचें आहे. तो सर्वसाक्षी, सर्वज्ञ, सर्वसमर्थ आहे हें सांगण्याचा हा काव्यमय प्रयत्न आहे. अर्थात् पुरुषसूक्ताचा हा भाग म्हणतांना प्रतिभा मोकळी सोडली पाहिजे. तरच या मंत्रांत भक्तिरस थबथबेल. पुढें शिवाचीं नांवें आहेत. हे सर्व मंत्र ब्रह्मा, विष्णु व शिव या त्रयींपैकीं शिवाला अनुलक्षून आहेत अशी भावना ठेवावी. शिवशक्ति प्रकट करणारा या पृथ्वीवरील सर्वांत मोठा विद्यमान अधिकारी म्हणजे भगवान् सनत्कुमार होय, हीहि भावना मनांत असावी. पृथ्वीपुरता विचार केल्यास सनत्कुमारांचाहि सूक्ष्म कोष सर्व पृथ्वीस व्यापून स्वर्ग लोकांत दशांगुळें उरलेला आहे.

फुलें वांटल्यावरचे मंत्र विष्णूस अनुलक्षून आहेत. त्या दिशेचे पृथ्वीवरील सर्वांत मोठे अधिकारी म्हणजे भगवान् बुद्ध व मैत्रेय हे होत. विष्णूंच्या बरोबर त्यांचाहि विचार त्या मंत्रांच्या वेळीं मनांत ठेवावा. भगवान् मैत्रेय हे सध्यांचे विद्यमान जगद्गुरु व भगवान् बुद्ध हे त्यांच्या पूर्वीचे जगद्गुरु होत. जगांतील अनेक धर्म त्या दोघांनींच स्थापिलेले आहेत. बुद्धांनी पूर्वीच्या एका जन्मीं व्यास म्हणून येऊन हिंदुधर्माची प्राणप्रतिष्ठा केली, आणि मैत्रेयांनीं गोकुळांत श्रीकृष्ण म्हणून येऊन हिंदुधर्मास उज्वलता आणिली. आज सनत्कुमार व मैत्रेय आपल्या पृथ्वीवर सदेह जीवमान आहेत.

. वरील मंत्रांत जीं प्रारंभी पुरुषसूक्तानंतर शिवाचीं नांवें आलीं आहेत त्या प्रत्येकामध्यें विशेष असा अर्थ असून तो कित्येक पौराणिककथांत कमीअधिक स्पष्टपणानें सांगण्यांत आलेला आहे. विश्वेश्वर व सर्वेश्वर हीं नांवें महादेव व सनत्कुमार या

दोघांसहि लागतात. सनत्कुमार हे पृथ्वीवरील सर्व उत्क्रान्तीचे स्वामी आहेत. त्र्यंबक याचा अर्थ तीन नेत्र असणारा असा आहे. सनत्कुमारांच्या जन्माच्या अगोदर शिव तप करीत असतांना देवांनी शिवाच्या हृदयांत कामवासना उत्पन्न करण्यासाठीं मदनाची योजना केली होती. त्या वेळीं शिवानें तिसरा नेत्र उघडून मदनाचें भस्म केलें, या कथेस अनुलक्षून हें विशेषण आहे. देहात्मारूपी दैत्यांनीं जडदेह, वासनादेह, व मनोदेहरूपी जे तीन किल्ले ( त्रिपुर ) बांधिले होते, त्यांचा नाश जीवात्म्यांतून येणाऱ्या शिवानें एका बाणानें केला अशी जी कथा आहे तीस अनुलक्षून, त्रिपुरांतक हें नांव आहे. शिव हा अंतरंगांतील सर्व किल्मिष जाळणारा असल्यामुळें त्यास कालाग्निरुद्र असें नांव आहे. समुद्रमंथनाच्या वेळी हालाहाल पिऊन कंठास निळेपणा आल्याची गोष्ट नीलकंठ या संज्ञेंत गर्भित आहे. ईश्वर स्वतःच्या अंतरंगांत, असत् आणि पाप, पचवूं शकतो हें दाखविण्याचा त्या गोष्टीचा कटाक्ष आहे. पुरुषाला कृष्णपिंगल[1] म्हणजे कृष्णवर्णी व पिंवळा या दोघांचें मिश्रण असें म्हटलें आहे. अद्वैतापासून द्वैत व्यक्त होऊन ह्या द्वंद्वाचे पुरुषप्रकृति नामक दोन भाग निरनिराळे ओळखूं येण्याच्यापूर्वी ते दोन्ही परस्परांत मिसळून परब्रह्मांत लीन होते, द्वंद्वातीत स्थितींत होते. या दोहींचें मिश्रण दाखविण्यासाठीं कृष्णपिंगल काळें-पिवळें असें वर्णन आहे. ]

## ( ८ ) नैवेद्य

( अध्वर्यु बसून तीर्थाच्यावर आपला हात धरतो व सर्व पुढील मंत्र म्हणतात. )

**सर्वे—ओम् भूः भुवः सुवः। ओम् तत्सवितुर्वरेण्यम् भर्गो देवस्य धीमहि। धियो यो नः प्रचोदयात्॥ देव सवितः प्रसुव॥ सत्यं त्वर्तेन परिषिंचामि॥ ओम् प्राणाय स्वाहा। ओम् अपानाय स्वाहा। ओम् व्यानाय स्वाहा। ओम् उदानाय स्वाहा। ओम् समानाय स्वाहा। ओम् ब्रह्मणे स्वाहा॥**

**सर्वे—ओम् ब्रह्मणि म आत्माऽमृतत्वाय॥**

---

१ **टीप**–श्री. जिनराजदास हे भा. स. पूजेच्या आपल्या इंग्रजी आवृत्तीत पृ. १८ वरील टीपेंत म्हणतात कीं "कृष्ण पिंगल पुरुष" म्हणजे सर्व अंधकार नाहींसा करणारा–सोनेरी वर्णाचा विश्व–पुरुष ( Cosmic MAN ) होय.

( नंतर तीर्थ वांटण्यांत येतें. * )

**( अर्थ — हे दैवी सवित्या ! तूं येथें जन्मास ये. हे सत्या, तुला मी ऋताचें ( खऱ्याचें ) परिसिंचन करतों. प्राणालाहि आहुति देतों. अपानालाहि आहुति देतों. व्यानालाहि आहुति देतों. इत्यादि इत्यादि. ओम् माझा आत्मा ब्रह्माशीं एकरूप होऊन अमृतत्व संपादन करो )**

[ **टीप** —या वेळीं हा सर्व भाग हळू म्हणतात, मोठ्यानें म्हणत नाहींत. तिचा पूर्वीसारखा परिणाम होतो. पण या वेळीं आनंद, स्वास्थ्य व शांति या गुणांची त्यांत आणखी भर पडते. गायत्रीच्या वेळीं पाण्यावर अध्वर्यूनें हात धरलेला असतो आणि तसाच पाण्यावर हात ठेवून ' सूर्या, तूं या पाण्यांत ये ' असें तो म्हणतो. ' सत्यं-त्वर्तेन ' या मंत्रानें तें तीर्थ अंतरंगदृष्ट्या सर्व इतर पदार्थांपासून वेगळें करण्यांत येतें. नंतर ' प्राणाय स्वाहा, ' ' अपानाय स्वाहा ' या मंत्रांनीं तें आपण ईश्वरार्पण करितों. दरवेळी अंतरंगाच्या भूमिकेवरील शक्ति येते आणि पाण्यांत राहते.

पण हें सर्व धडपणें होण्यास सर्वांच्या मनांत श्रद्धा व निर्धार हीं पाहिजेत व त्या त्या गोष्टी होत आहेत असा जोराचा विचार मनांत पाहिजे. प्रत्येकास तीर्थ देतांना आपण ईश्वरी सामर्थ्य वांटीत आहों अशी देणाराची भावना पाहिजे. तीर्थ घेणारानें घेतेवेळीं ' ब्रह्मणि म आत्मा अमृतत्वाय । ' हा मंत्र मनांत म्हणून आपण ईश्वराचे अमृतत्वाशीं एकरूप होत आहों असा निश्चय केला पाहिजे; आपण पाण्यांतून त्याची शक्ति आपल्या अंतरंगात घेत आहों हा विचार त्यानें आपल्या मनांत ठेविला पाहिजे.

हा प्रसाद घेण्याची तयारी म्हणून फुलें वाहण्याच्या वेळीं समईच्या ज्योतींतून एक प्रकारची शक्ति उपासकाच्या अंतरंगांत शिरते, असें वर म्हटलेंच आहे. तो

---

* **टीप**—प. वा. श्री. सी. जिनराजदास (माजी अध्यक्ष थिऑसॉफिकल सोसायटी ) यानीं रचिलेल्या दि रिच्युअल ऑफ दि मिस्टिक स्टार-या विधीच्या शेवटच्या भागांत जमलेल्या मंडळीस प्राचीन हिंदुपद्धतीस अनुसरून तीर्थ वांटण्यांत येतें. त्या विधींत भाग घेणाऱ्या मंडळींनीं बंधुभावानें सर्वांशीं वागण्याचा निश्चय केल्याचें तीर्थप्राशन हें द्योतक आहे, असें तेथें मानलें आहे. हा विचार याही पूजेंत भाग घेणाऱ्यांनीं लक्ष्यांत ठेवण्यासारखा आहे. पहा MEANING AND PURPOSE OF THE RITUAL OF THE MYSTIC STAR पृ. ७ आवृत्ति १९४५.

भाग नीटपणें केल्यास तीर्थोदक घेतांना तिला पूरक अशी शक्ति त्यांच्या अंत-रंगांत शिरते. स्थिरपणा, शांतपणा, समतोलपणा वगैरे गुण ती उत्तेजित करते.

हें झाल्यावर ज्या विचारचित्राची येथवर क्रमानें बांधणी होऊन तें चैतन्यानें भारण्यांत आलें तें मोडून टाकून त्यांतील सर्व शक्ति सभोंवतालच्या प्रदेशावर सोडण्यांत येते. या क्रियेस दिग्विमोक म्हणतात. दिग्विमोक म्हणजे पूर्वी दिग्बंध केला होता तो मोडणें. तो आतां यानंतर करावयाचा असतो. ]

## ( ९ ) दिग्विमोकः

**अध्वर्युः—भूर्भुवस्सुवर् ओम् ( इतिदिग्विमोकः )**

( अर्थ–शब्द उघड आहेत. )

[ टीप—शक्तिसंचय करण्यासाठीं विचार-चित्राची बांधणी करण्यांत आली होती. ती शक्ति सर्वत्र पसरण्यासाठीं त्या विचारचित्राचे बांध मोडावे लागतात. ते वरील मंत्र म्हटला म्हणजे मोडले जातात. हा ईश्वरी प्रसाद्–ही शक्ति–चौफेर पसरविण्यासाठीं पुढील आशीर्वाद अध्वर्यु म्हणतो; त्या वेळीं सर्व उभे राहतात. अध्वर्यूनें हात वर करणें । ]

## ( १० ) आशीर्वादः

**अध्वर्युः—ओम् ऋध्यास्म हव्यैर्नमसोपसद्य**
**मित्रं देवं मित्रधेयं नो अस्तु ।**
**अनूराधान् हविषा वर्धयन्तः**
**शतं जीवेम शरदः सवीराः ॥**

**सर्वे—ओम् तच्छंयोरावृणीमहे । गातुं यज्ञाय ।**
**गातुं यज्ञपतये । दैवीः स्वस्तिरस्तु नः ।**
**स्वस्तिर्मानुषेभ्यः । ऊर्ध्वं जिगातु भेषजम्**
**शं नो अस्तु द्विपदे । शं चतुष्पदे ॥**
**ओं शान्तिः शान्तिः शान्तिः ॥**

**ओम्—सर्वे वै सुखिनस्सन्तु सर्वे सन्तु निरामयाः ।**
**सर्वे भद्राणि पश्यन्तु न कश्चिद्दुःखभाग् भवेत् ॥**

**ओम् शान्तिः शान्तिः शान्तिः ॥**

**सर्वे—ओम् तत्सद्ब्रह्मार्पणमस्तु ।**

( अर्थ—अध्वर्युः–आहुति देत व नमस्कार करीत आम्ही ईश्वराजवळ जात आहों. म्हणजे ईश्वरासारखे होत आहोंत. आम्हांस समृद्धि असो.

मित्रदेव व मित्रत्वाचा आधार आम्हांस मिळो. देवांचा प्रसाद आमच्या आहुतींनीं वाढो व जे जीवन्मुक्त वीर आहेत, त्यांच्या समागमांत आमचें शंभर वर्षें आयुष्य जावो. )

(सर्व)—यज्ञाकरितां व यज्ञपतीकरितां सूक्तें म्हणण्यासाठीं आम्ही तो प्रसाद मागतों. तो दैवी प्रसाद आम्हांस मिळो. सर्व माणसांस सुख लाभो. तो प्रसाद पसरत वर जावो. द्विपाद् व चतुष्पाद् यांना सुख असो. ओम् शान्तिः शान्तिः शान्तिः। ओम् सर्व लोक सुखी असोत, सर्व लोक निरोगी असोत. सर्वांस चांगलें दृष्टीस पडो. कोणीही दुःखी न होवो! ओम् शान्तिः शान्तिः शान्तिः।

(सर्व)—हें सर्व ब्रह्मार्पण असो.)

[ **टीप**—अदृश्य प्रसाद सर्वत्र पसरावा यासाठीं हे मंत्र आहेत व सर्वांनी सुखी असावें हा त्यांतील मुख्य भाग आहे हें उघड आहे, 'शतं जीवेम शरदः सवीराः' येथपर्यंतचा भाग उपासनेसाठीं जमलेल्या लोकांस अनुलक्षून आहे. त्यापुढील मंत्र आसमंतातच्या प्रदेशांतील सर्व जीवांसाठीं आहे. हे सर्व मंत्र निर्धारपूर्ण मनानें व सर्वांस हितकर असा ईश्वरी प्रसाद सर्वत्र पसरत आहे, अशा भावनेनें म्हणावयास हवेत. नुसत्या माणसांकरितांच तो प्रसाद नाहीं; द्विपाद्, चतुष्पाद् वगैरे शब्दांवरून तो सर्व जीवांसाठीं आहे हें ध्यानांत येईल. ज्यांस असल्या साहाय्याची अपेक्षा आहे, जे अडचणींत आहेत अशा विशेष व्यक्तींची मनांत आपण या वेळीं आठवण केल्यास व त्यांस साहाय्य करण्याचा मनानें निर्धार केल्यास तें साहाय्य त्यांना या प्रसंगीं जाऊन पोहोंचतें.

ही शक्ति खरोखरीच सर्वत्र पसरते. ती शान्तिदायक असते. हिंदुस्थानाला असल्या शान्तिदायक शक्तीची फार जरूर आहे. ती पसरणारीं जिवंत पूजास्थानें सर्व हिंदुस्थानभर ठिकठिकाणीं जर स्थापिलीं गेलीं व त्या केंद्रांतून रोज अशा शक्तींचा सतत भर वर्षाव झाला तर त्याचा मोठा परिणाम होईल व लोकांमधील भेद व द्वेष कमी होऊन हिंदुस्थानास आपली भावी जगांतील भूमिका नीटपणें घेण्यास सोपें होईल.

वर आलेल्या या पूजाविधिवरून त्याचें रहस्य लक्षांत येईल. त्यांतील मंत्र व विधि सर्व जुने आहेत. पण पूजाविधीच्या भागांची रचना नवीन आहे. अदृश्य भूमिकेवर काय काय परिणाम होतात हें पाहूनच हा विधि रचण्यांत आलेला आहे.

त्याची नीट व सांगोपांग कल्पना वरील तपशिलावरून कोणासहि येईल. **या पूजेचे दोन हेतु** आहेत. एक उपासकांस पुनीत करून त्यांस उत्क्रान्तिमार्गावर पुढें जाण्यासाठी योग्य ती आध्यात्मिक प्रेरणा देणें. दुसरा, सभोंवतालच्या प्रदेशावर योग्य दिशेचा आध्यात्मिक परिणाम करणें. अर्थात् या विधींत उपासकाचा फायदा आहे, आणि सभोंवतालीं राहणाऱ्या सर्व जीवांचा आध्यात्मिक दृष्ट्या फायदा आहे. अर्थात् हा विधि नेमानें व पुन. पुनः केल्यास त्याचा एकंदर परिणाम पुष्कळच होईल.

माणसामाणसांच्या मनोवृत्ति वेगवेगळ्या असतात. कांहीं मनोवृत्तींच्या माणसांना निरनिराळ्या विधींत स्वभावतःच आनंद व उल्हास वाटतो. कांहींस विधि व संस्कार यांची गोडी मुळींच वाटत नाहीं. हा सर्व प्रकृति-भेदाचा खेळ आहे. माणसाच्या वृत्ति निरनिराळ्या असतात; पण त्या निरनिराळ्या आहेत यावरून एकाची किंमत कमी व एकाची जास्ती असा त्याचा अर्थ नाहीं. ज्याची जशी वृत्ति असेल त्या मार्गानें त्यानें स्वतः जाणें त्यास सर्वांत सोपें व हितकर असतें. अर्थात् ज्यांचा ओढा संस्कार व विधि यांजकडे स्वभावतःच आहे त्यांस या पूजाविधीचा सर्वांत अधिक फायदा होईल. हा विधि इतर विधींसारखा नसून त्यांतील निरनिराळ्या भागांत एकसूत्रीपणा आहे, आणि सूक्ष्मदृष्टीच्या संशोधनामुळें त्या विधीपासून कोणते परिणाम होतात तें समजल्यामुळें हा विधि आंधळेपणानें करण्याची आवश्यकता नाही. त्याचे योग्य परिणाम सर्व हवे असतील तर तो नीट समजून घेऊन केला पाहिजे. तो नीट करण्यास त्याची चांगलीच संवय करावी लागेल. ठिकठिकाणीं योग्य ती मनाची भावना ठेवणें, मंत्रांचा अर्थ मनांत आणणें, स्वच्छता सर्वत्र ठेवणें, सर्व बारीक गोष्टीहि अगदीं नीटसपणें करणें, सर्वांनीं एका सुरांत मंत्र म्हणणें या गोष्टी नित्य परिपाठाशिवाय नीट साधणार नाहींत. पण ज्याची मनोरचना विधींस अनुकूल असेल अशा माणसानें सारखा प्रयत्न ठेविल्यास या विधीपासून त्यास अधिकाधिक आनंद व समाधान हीं वाटतील व स्वतःचें हित आणि लोकसंग्रह साधतां येईल. ज्या मंडळींस स्वभावतःच संस्कारांची गोडी नसेल त्या मंडळींस इतका उपयोग या विधीपासून न झाला तरी त्यांसहि बराच उपयोग होईल यांत शंका नाहीं. त्यांनींहि या विधींत भाग घ्यावा आणि **हें वैयक्तिक आणि सार्वजनिक कार्य आहे हें त्यांनींहि लक्षांत असूं द्यावें.** त्यांचा स्वतःचा मार्ग जरी विधि व संस्कार यांच्या दिशेनें जाण्याचा नसला तरी तो नैसर्गिक असा उत्क्रांतिमार्ग आहे हें ओळखून ते त्या मार्गाविषयीं योग्य तो

आदरभाव ठेवितील व शक्य तर त्या विधींस स्वतःचें साहाय्यहि देतील अशी आशा करणें गैरवाजवी होणार नाही. ]

---

## भारत समाजीय सामुदायिक पूजेची आवश्यक सामुग्री

( १ ) चांदीची अगर पितळेची समई;

( २ ) दोन स्टुलें; एक १·।·×१·।·×१·।· फूट व दुसरें सुमारें निम्या उंचीचें;

( ३ ) एक होमपात्र व तें ठेवण्याकरितां एक थाळी;

( ४ ) एक धुपाटणें व त्याच्या खालील एक थाळी;

( ५ ) एक मंजुळ आवाजाची लहान घंटा;

( ६ ) एक पंचारती किंवा निरांजन व त्याचे खालील एक तबक अगर ताम्हण;

( ७ ) समईंत व निरांजनांत फुलवाती व तूप;

( ८ ) एक लहानसा चिमटा;

( ९ ) दोन चांदीचीं फुलपात्रें अगर पेले—एकावर तबकडीचें झांकण व एक पळी;.

( १० ) एक पळीपंचपात्र व ताम्हण;

( ११ ) एक तांब्या;

( १२ ) एक तबक फुलें ठेवण्यास व तबक ठेवण्यास लहानसें स्टूल;

( १३ ) एक पूजेची परडी किंवा तबक व त्यांत ( चंदन ) काटक्या अगर सालप्या अगर भुस्सा;

( १४ ) ऊद—कापूर—काड्याची पेटी;

( १५ ) धुपाटण्यांत अगर होमपात्रांत निखारे;

( १६ ) फुलें—जमलेल्या मंडळीस मंत्रपुष्पांजलीकरतां वांटण्यास व समई सभोंवतीं ठेवण्यास;

( १७ ) दोन आसनें व दोन, हात पुसण्याकरितां, रुमाल;

( १८ ) मंडळीस बसण्यास आसनें किंवा सत्रंजी;

( १९ ) स्वच्छ व शांत स्थळ;

( २० ) आचार्य ( अध्वर्यु ) पूर्वाभिमुखी;

( २१ ) आचार्यासमोर बसणारा मदतनीस.

---

# भारत समाजाचे विद्यमानें पुढील पुस्तकांचें प्रकाशन करण्यांत आलें आहे:-

रु. आ. पै.

( १ ) **भारत समाजीय नित्यपूजाविधानम्**—मूळ संस्कृत संहिता, तिचें रोमन लिपींत रूपांतर—डॉ. कुन्हनराजाकृत शब्दशः इंग्रजी भाषांतर व टीपासह—हल्लीं दुर्मिळ—किंमत ०—६—०

( २ ) **भारत समाजीय नित्यपूजाविधानम्**—तेलगू लिपिंत—तेलगू भाषांतर व टीपासह—किं. ०—४—०

( ३ ) Abridged Daily Practice किंमत ०—१—०

( ४ ) **उपनयन—विवाह—प्रयोग**—साध्या स्वरूपांत देवनागरींत मूळ संहिता व तिचें इंग्रजी भाषांतर किं. ०—८—०

( ५ ) **भारत समाजीय नित्यपूजाविधानम्**—मूळ संस्कृत संहिता—हिंदीभाषांतर—टीपा व प्रस्तावनेसह. ले. रायबहादुर पंड्या वैजनाथ ( कमच्छा, बनारस )—किं. ०—६—०

( ६ ) A Congregational Puja for the Hindus—मूळ संस्कृत संहिता-डॉ. कुन्हनराजाकृत इंग्रजी भाषांतर, लेडबीटर यांचा या पूजेच्या अदृश्य परिणामाचें विवेचन करणारा लेख व कै. वा. प्रो. पंढरीनाथ काशीनाथ तेलंगांचा पूजेचें विवरणाचा लेख वगैरेसह ( सचित्र व सर्व-संग्राहक आवृत्ति ) ( दुर्मिळ )—किंमत .. १—०—०

( ७ ) **भारत समाजीय नित्यपूजाविधानम्**—( मूळ देवनागरी—रोमन लिपींत रूपांतर व शब्दशः इंग्रजी भाषांतर)—आवृत्ति १९५२—किं. १—०—०

( ८ ) **पिण्डश्राद्ध** ( साध्या स्वरूपांत )—( मूळ संस्कृत संहिता—देवनागरींत—व इंग्रजी भाषांतर )—किं. ०—८—०

---

( १ ) BHARAT SAMAJ PUJA—with English Translation and description of its occult effects as seen by clairvoyance by (late) C. W. LEADBEATER with introduction and notes by C. Jinarajadasa—with two coloured illustrations of the TEMPLE THOUGHT-FORM 0-12-0

सदरहू पुस्तकें मिळण्याचें ठिकाण:—( १ ) थिऑसॉफिकल पब्लिशिंग हौस, अड्यार मद्रास २०. ( २ ) इंडियन बुकशॉप—थिऑसॉफिकल सोसायटी, कमच्छा बनारस.